

एक भक्त लोहार ह्याची कन्या आगीत पडली म्हणून तिला वाचवण्यासाठी बाबा आपला हात अग्नीदेवतेला अर्पण करू लागले.

# श्रीसाईबाबा अगम्य लीला विशेषांक

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥



## श्रीसाई वाक्सुधा

गोरसेंसीं वत्स धालें ।
तरी न मायेपासूनि हाले ।
तैसें मन हें पाहिजे बांधिलें ।
दावणीं दाविलें गुरुपायीं ॥ ७७ ॥

व्हावया गुरुकृपानुरागा ।
वंदा सत्पदकमल परागा ।
केलिया हितबोधा जागा ।
अनुभव घ्यागा पदोपदीं ॥ ७८ ॥

यथेच्छ रमतां इन्द्रियार्थीं ।
अंतरीं ठेवा साईप्रीती ।
तोचि कामा येईल अंतीं ।
स्वार्थीं परमार्थीं उभयत्र ॥ ७९ ॥

मंत्रसिद्ध मांत्रिक अंजन ।
दावी पायाळूस भूमिगत धन ।
तैसेंच गुरुपदरजधूसर नयन ।
ज्ञानविज्ञान पावती ॥ ८० ॥

सिद्धांची जीं जीं लक्षणें ।
साधकांची तीं तीच साधनें ।
साध्य कराया दीर्घ प्रयत्नें ।
अभ्यास सूत्रें करावा ॥ ८१ ॥

·श्रीसाईसच्चरित अध्याय ३७ वा


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५८ वे ] जून १९७९ [ अं. ३

: संपादक :

श्री. क. ही. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं ८०४–बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ २३ ६१

# अनुक्रमणिका–जून १९७९


| अनुक्रमांक | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. | पृथ्वीवरील मोठा चमत्कार—श्रीसाईबाबा | | ३ |
| २. | प्रा. द. दि. परचुरे ह्यांना श्रद्धांजलि | | ५ |
| ३. | श्री. तात्याबा पाटील कोते | डॉ. के. भ. गवाणकर | ७ |
| ४. | श्रीसाईंचे अद्वितीय योगसामर्थ्य | | १० |
| ५. | श्रीसाईनाथांच्या अजब लीला | | २० |
| ६. | काशीराम शिंपीची अजब कथा | | २४ |
| ७. | श्रीबाबा परकाया प्रवेशही करीत | | ३० |
| ८. | पंचमहाभूतांवरही बाबांची सत्ता | | ३३ |
| ९. | अंतर्ज्ञानी साईनाथ | | ३५ |
| १०. | शिरडीवृत्त–मार्च ७९ | | ४५ |
| ११. | श्री साई भेट | श्री. अ. रा. नाईक | ४७ |
| १२. | ॐ नमो साईनाथा | श्री. प्र. के. अमृते | ४८ |

## संपादकीय —

स. न. वि. वि.

# पृथ्वीवरील मोठा चमत्कार — श्रीसाईबाबा

श्रीसाईलीला मासिकाचा हा श्रीसाईबाबा अगम्य लीला विशेषांक साई-भक्तांच्या हाती या महिन्याला देत आहोत. आमच्या तेरा खास अंकांच्या मालिकेतला हा आठवा खास अंक आहे.

श्रीसाईभक्तांनो, आपणास माहितच आहे की चमत्काराशिवाय नमस्कार नाही. म्हणजे जो पुरुष चमत्कार दाखवितो तो देवासमान मानला जातो. परंतु असे जरी असले तरी श्रीसाईबाबांचे चरित्र, जीवन संपूर्णपणे चमत्काराने भरलेले आहे व केवळ या मुद्यावर त्यांना अवतार मानावे असे सुशिक्षित व चिकित्सक मंडळी म्हणतात. श्रीबाबांना सर्व सिद्धी प्राप्त झाल्या होत्या असाही भक्तांचा खात्रीचा कयास आहे. सिद्धी या फक्त सत्पुरुषांनाच काय त्या प्राप्त होतात व त्या सिद्धीच्या बळावर सत्पुरुष चमत्कार करून दाखवितात. श्रीकृष्णाने द्रौपदीचे सत्व राखले. नवनाथांपैकी श्रीनरसिंह नवनाथ याला तर खेळता खेळता श्रीदत्तांचे दर्शन घडले. त्यांनी तो नारायणाचा अवतार असल्याचे समजून त्याला आत्मस्वरूपाची जाणीव व्हावी म्हणून त्याला एक सिद्धी दिली. त्या सिद्धीशक्तीच्या जोरावर तो कुणासही इच्छा भोजन देत असे. श्रीसाईंनी अशा सिद्धीशक्तीचे कितीतरी प्रयोग कितीतरी भक्तांना दाखविले याचा प्रत्यय श्रीबाबांच्या आयुष्यात ठायी ठायी येतो.

या भारतात संत पुष्कळच होऊन गेले परंतु श्रीसाईबाबांच्यासारखा संत विरळाच. वेड्यात वेडा, शहाण्यात शहाणा, ज्याला जे पाहिजे, हवे त्याला ते देणारा, साता समुद्रापलिकडील मानवाचेसुद्धा रक्षण करणारा, मृत्यूच्या जबड्यातून, कृतांताच्या दाढेतूनसुद्धा मानवाला सोडविणारा, हयातीतच नाही तर हयातीनंतरसुद्धा आपल्या तुर्बतीतून स्वतःच्या हाडांना बोलविणारा, आपल्या समाधीच्या दर्शनाने मानवांना डोलविणारा श्रीसाईसारखा संत पृथ्वीतलावर निर्माण झाला हे या पृथ्वीचे भाग्य आहे; नव्हे या पृथ्वीवरचा तो सर्वांत मोठा चमत्कार आहे. वसुंधरा सर्व संतांना विसरली तो तिचा स्वभाव आहे; परंतु श्रीसाईनाथांना विसरणे यावत् चंद्र दिवाकरौ त्या पृथ्वीलाही शक्य नाही. श्रीसाईचा अवतार परमेश्वराच्या नऊ अव-

तारांनासुद्धा लाजवतो, मागे टाकतो. याला कारण त्यांनी उभ्या ह्यातीत दाखविलेल्या असंख्य लीला, चमत्कार हे होय. ते अतींद्रिय योगी होते. ते अंतर्ज्ञानी होते, ते परकाया प्रवेश करीत असत. ते पशू प्राणीमात्रात समाविष्ट होत असत. त्यांना पूर्व जन्मीचेही ज्ञान होते. त्यांना बंधन असे कसलेच नव्हते. श्रीबाबांच्या साठाव्या पुण्यस्मरणाच्या निमित्याने बाबांच्या अशा या लीला, त्यांचे चमत्कार एकत्रित करून ते वाचकांच्या हाती देत आहोत. या चमत्कारांची आम्हीच काय पण कुणीही छाननी करू शकत नाही व छाननी करणे हे योग्यही होणार नाही. या अंकातला हा संपूर्ण मजकूर संपादकांनी स्वतः मेहनत घेऊन तयार केलेला आहे. श्रीसाईलीलेच्या आजवरच्या ५८ वर्षांच्या वाटचालीत अशा मजकुराने गच्च भरलेला असा हा अगदी पहिलाच अंक असल्याने वाचकांनी या अंकावरच्या आपल्या प्रतिक्रिया अवश्य कळवाव्यात अशी अपेक्षा आहे. आमचे मासिक छोटेखानी ४८ पानी असल्याने व अलीकडे अलीकडे तर श्रीसाईलीलावर गद्य, काव्य लेखनाचा अक्षरशः वर्षाव होत असल्याने सर्वच नाही तरी त्यातल्या त्यात काही प्रतिक्रिया पुढील अंकी निश्चित नावानिशी प्रसिद्ध करू असे तूर्ततरी आश्वासन देतो.

॥ जय श्रीसाईराम ॥

# श्रीसाईलीला

**पुढील अंक ७ खास गुरुपौर्णिमा विशेषांक**

**१ जुलै १९७९ रोजी प्रसिद्ध होईल.**

# प्रा. द. दि. परचुरे ह्यांना श्रद्धांजलि

मुंबई येथील सिद्धार्थ महाविद्यालयात प्रा. द. दि. परचुरे हे गणित विषय शिकवीत असत. गणित हा ऐच्छिक विषय घेऊन त्यांनी एल्फिन्स्टन महाविद्यालयातून बी. ए. व एम्. ए. ह्या पदव्या संपादन केल्या होत्या. गणित ह्या विषयाचे एक चांगले शिक्षक म्हणून त्यांनी सिद्धार्थ महाविद्यालयात लौकिक प्राप्त करून घेतला होता, तरी त्याचबरोबर त्यांचे इंग्रजी व मराठी वाङ्मयाचे वाचन चांगले होते. एवढेच नव्हे तर मराठी आणि इंग्रजी नियतकालिकांतून त्यांचे बरेच लेखही प्रसिद्ध होत असत. त्यांना धार्मिक विषयांची व अध्यात्माची आवड असल्यामुळे त्यांनी प्रवचने करण्यास सुरवात केली. पुढे त्यांनी कीर्तनांचा अभ्यास केला व ते कीर्तनेही करू लागले. त्यांच्या ह्या प्रकारच्या नैसर्गिक प्रवृत्तींमुळे ते साईबाबांकडे सहाजिकपणेच आकृष्ट झाले व त्यांनी शिरडी संस्थानतर्फे निघणाऱ्या साईलीला ह्या मासिकाच्या कार्यकारी संपादकत्वाची जबाबदारी पत्करली व त्यांत सुधारणा करण्यास सुरवात केली. इंग्रजी, मराठी, हिंदी असे सर्व लेख एकत्र छापण्यापेक्षा मराठी भाषेत एक स्वतंत्र अंक काढावा व इंग्रजी आणि हिंदी लेखांचा स्वतंत्र अंक काढावा अशी एक कल्पना त्यांना सुचली व त्यावेळचे कोर्ट रिसीव्हर श्री. पाठकसाहेब ह्यांनी ती उचलून धरली. म्हणून एक एप्रिल १९७३ पासून श्री साईलीला मासिकाचे दोन स्वतंत्र अंक निघू लागले; परंतु एप्रिल, मे व जून असे केवळ तीनच अंक निघाल्यावर प्रा. परचुरे ह्यांना दिनांक १-६-७३ ला हृदयविकाराचा झटका येऊन त्यांतच त्यांचे निधन झाले. प्रा. परचुरे ह्यांच्यासारख्या स्वतंत्र विचाराच्या व कार्यक्षम संपादकाच्या अकाली निधनाने श्री साईलीला मासिकावर मोठीच आपत्ति कोसळली; परंतु नव्या संपादकांनी ह्या आपत्तीस तोंड देऊन मासिकाचे काम नेटाने चालू



ठेवले व त्यात सुधारणा करण्याचे प्रयत्न सतत चालू ठेविले आहेत. तरी काही प्रसंगी असे वाटल्याशिवाय रहात नाही की प्रा. परचुरे ह्यांचे मार्गदर्शन मासिकाला मिळत राहिले असते तर मासिकाने कदाचित ह्यापेक्षाही अधिक प्रगती केली असती.

महान साईभक्त श्री दासगणूमहाराज हे आपल्या कीर्तनांतून साईभक्तीचा सतत प्रचार करीत असत; परंतु त्यांची कीर्तने छापलेली नाहीत. दुसरे एक मोठे साईभक्त श्री. बी. व्ही. देव ह्यांनी साईबाबांच्या चरित्रावर आधारित अशी काही कीर्तने रचली होती व ती शिरडी संस्थानाने छापलीही होती; परंतु साईसच्चरित्राचा सप्ताह करण्याच्या दृष्टीने समग्र साईचरित्रावर आधारित अशी आठ कीर्तने प्रा. परचुरे ह्यांनी रचली व "साई कीर्तनमाला" ह्या पुस्तकाच्या रूपाने ती शिरडी संस्थानने प्रकाशित केली आहेत. महाराष्ट्रातील बऱ्याच प्रथितयश कीर्तनकारांनी प्रस्तुत पुस्तकाबद्दल गौरवोद्गार काढले आहेत.

लहानपणापासून मुलांमध्ये साईभक्तीची आवड निर्माण व्हावी म्हणून सोप्या भाषेत, साईबाबांचे चरित्र गोष्टीरूपाने सांगणे आवश्यक होते. ही निकड जाणून प्रा. परचुरे ह्यांनी मुलांसाठी साईबाबांचे गोष्टीरूप चरित्र "मुलांचे साईबाबा" ह्या नावे लिहिले व ते संस्थानने प्रसिद्ध केले. ह्या पुस्तकाला जो प्रतिसाद मिळाला तो पाहून प्रा. परचुरे ह्यांनी ह्या पुस्तकाचा जो इंग्रजी अनुवाद करून ठेविला होता तोही संस्थानाने प्रसिध्द केला. ह्या दोनही पुस्तकांची वाढती मागणी लक्षात घेऊन, प्रस्तुत पुस्तकाचा अनुवाद हिंदी, गुजराती व तेलगु भाषेतही प्रसिध्द झाला आहे. संस्थानाला अशी आशा आहे की हे पुस्तक लवकरच सर्व भारतीय भाषांत प्रसिध्द होईल व त्यायोगे साईभक्तीचा प्रसार अखिल हिंदुस्थानात होईल.

दिनांक १ जून १९७९ ला येणाऱ्या प्रा. परचुरे ह्यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त सर्व साईभक्त, साईलीला मासिकाचे वाचक, लेखक व कवि ह्या सर्वांचे वतीने आम्ही त्यांना श्रद्धांजली वहातो व त्यांचे आत्म्यास चिरशांति लाभो अशी परमेश्वरापाशी प्रार्थना करितो!

श्रीसाई दरबार विशेषांकासाठी हा लेख आला खरा पण तो उशिरा हाती आल्याने त्या अंकात प्रसिद्ध होऊ शकला नाही. तो येथे देत आहोत. —संपादक

# श्री तात्याबाबा पाटील कोते

— डॉ. के. भ. गव्हाणकर
इंदिरा निवास, आग्रारोड कुर्ला, मुं. ७०

● श्रीसद्गुरू साईबाबांना ज्यांनी स्वहस्ताने भाकरी खाऊ घातली त्या श्रीमती (कै.) बायजाबाई पाटील कोते. त्यांचे चिरंजीव तात्याजी गणपत पाटील कोते यांना सर्व तात्याबा म्हणत असत. शिरडी येथील त्यावेळचे एक वजनदार शेतकरी, दिसण्यात भव्य, पिळदार बांध्याचे, संपूर्ण मराठेशाही पेहरावाचे, गावात मोठा दरारा. गावातील तक्रारींचे निवारण तात्याबाबा शिवाय होतच नसे. प्रत्येक खेड्यात अशी एक जबाबदार व्यक्ती असतेच, त्याप्रमाणे शिरडी खेड्यात तात्याबाबा.

तात्याबाबा सर्वगुण संपन्न होते. हरएक तऱ्हेच्या गुणी जनांचे आश्रयस्थान म्हणजे तात्याबाबांचे घर. हरीदास, पुराणीकच काय पण तमाशेवाले जरी आले, तरी त्यांची सर्व व्यवस्था तात्याबाबांकडेच. तमाशेवाल्याला तमाशा करावयाला लावून, बिदागी देऊन मगच त्यांची रवानगी करीत. त्यांच्या बैठकीची जागा रिकामी सहसा सापडत नसे. पान खाण्याचा दांडगा षौक असल्यामुळे बैठकीतील पानाचे तबक सदा भरलेले असावयाचेच. या पानाच्या तबकावर गावातील बऱ्याच लोकांचा पान खाण्याचा षौक पुरवला जात होता.

तात्याबाबा मनाने जसे दिलदार होते, तसे हातानेही सढळ होते. शिरडी गावातील श्रीगणपती, महादेव, शनैश्वर, महालक्ष्मी या देवतांची देवालये स्वखर्चाने त्यांनी बांधली आहेत. गावचे हनुमानाचे देवालय बांधण्यास सुद्धा खर्चाचा बराच मोठा भाग त्यांनी उचलला होता.

श्रीसमर्थ साईबाबा आणि तात्याबाबा यांचे मामा भाच्याचे नाते मानले जात असे. बाबा यांचा राग त्यांना अनावर झाला म्हणजे फक्त तात्याबाबाच त्यांना शांत करू शकत. इतरांची नुसते साईबाबांच्या जवळ जाण्याची ताकद नव्हती. चावडीच्या मिरवणुकीलासुद्धा साईबाबा, तात्याबाबा आल्याशिवाय द्वारकामाईमधून उठत नसत. दुपारचे भोजनालासुद्धा बाबांच्या बरोबर तात्याबाबा असावयाचे. रात्रौ ८ वाजण्याचे सुमारास तात्याबाबांनी द्वारकामाईत आणलेली भाकरी साईबाबा थोडीशीच का

होईना पण मोठ्या प्रेमाने खात असत. साईबाबा तात्याबाबांना रोज रु. ३५/- देत असत.

शिरडी गावात आखाडी भरत असे. त्यात राजाचे सोंग तात्याबाबा करीत. आखाडीच्या खर्चाचाही थोडासा वाटा ते उचलीत असत. श्रीमंत गोपाळराव बुट्टी आखाडीसाठी ५०० रुपये देत असत. त्यावेळची शिरडीची आखाडी फार प्रसिद्ध होती. लांबलांबून ती पहाण्यासाठी लोक येत असत. साईबाबा चावडीत बसून आखाडी पहात असत.

सर्व थरांच्या लोकांवर तात्याबाबा फार उपकार करीत. निरनिराळया तऱ्हेची (द्रव्यद्वारा) मदत नेहमी चालू असावयाचीच. ज्या ज्या लोकांवर उपकार केले, मदत केली, त्यापैकी एकही जण स्मरून तात्याबाबांचे उपयोगी पडला असेल तर शपथ. परोपकाराकरिता तात्याबाबांचे जवळ होते नव्हते ते सर्व संपुष्टात आले. कर्जबाजारी होण्याची पाळी आली पण त्याहि परिस्थितीला ते डगमगले नाहीत. सत्याने चालणाऱ्याचे असेच हाल होत असतात. हे जग रूढीच्या बाहेरचे नाही. खरोखर म्हटले म्हणजे तात्याबाबा शिरडीचा एक धर्मात्मा होता असे म्हटले तर वावगे होणार नाही. विशेष नवलाची गोष्ट म्हणजे त्यांच्या अंतकालाच्या समयाला कोणाचे एक पैसुद्धा कर्ज त्यांचेवर राहिलेले नव्हते; ही श्रीसाईबाबांची कृपाच होय.

एकनाथ षष्टीचे दिवशी सायंकाळी रथाचे मिरवणुकीच्या वेळी तात्याबाबा कोते यांचेवर बाबा रागावले. ज्या वेळी तात्याबाबा कोते यांच्यावर बाबा रागावले त्यावेळी तात्याबाबाही बाबांवर खूप संतापले. दोघेही हट्टाला पेटले. रात्री १२ वाजेपर्यंत मिरवणूक थांबून राहिली. नंतर बाबा शांत झाले. तात्याबाबांनीही आपला हट्ट सोडला व मग मिरवणूक आनंदाने झाली.

तात्याबाबा कोत्यांचे उपरणे दडवून ठेवणे, खांबामागून त्यांना ढकलून देणे, त्यांचे डोळे झांकणे व हे कोणी केले असे विचारले म्हणजे पुन्हा खांबाआड दडून बाबांनी खदखदा हसणे असे नेहमीच चालायचे.

द्वारकामाईत बाबा, तात्याबाबा व म्हाळसापती रात्री निजले असता झोपेत याचे पाय त्याच्या उरावर, त्याचे पाय याचे उरावर, कोणाचे पाय आपले अंगावर असे करून ठेवावे. सकाळी उठून पहावे व विचारावे बाबा हे कोणी केले म्हणजे बाबांनी खदखदा हंसावे.

भर उन्हाळयात तात्याबाबाला धगधगीत पेटलेल्या धुनीमाईजवळ निजवाव-याचे व त्यांना झोप लागली म्हणजे आपली घाबळी त्यांचे अंगावर घालावयाची.

यामुळे त्यांचे सर्वांग नखशिखांत घामाने डबडबे. ते जागे होत व सर्व घाम पुशीत. बाबा हे कोणी केले म्हणून विचारले म्हणजे बाबा खदखदा हसत.

बाबा कधी कधी तात्याबाला गुदगुदल्या करीत व बाबा हे काय म्हणून विचारले म्हणजे हसत. त्यांना कधी कधी पोटऱ्या व मांड्या चेपावयास सांगत व तात्याबांनी जर हात वर नेला म्हणजे म्हणत " हां उपर हात मत लगाओ, हां उपर हात मत लगाओ " व खदखदा हसत.

बाबा तात्याबाबांबरोबर फुगड्या घालीत, कुस्ती खेळत, कधी कधी सोंगट्या खेळत, कधी कधी पंजा खेळत, हैदोस-धुल्ला घालीत.

☆


## * श्रीसाईलीला *

**सर्वांगसुंदर भव्य दिवाळी अंक १९७९**

* भगवान श्रीसाईबाबांच्या जगभर पसरलेल्या असंख्य साई भक्तांना आलेल्या बाबांच्या विषयीच्या विविध अनुभवांनी अगदी गच्च असा सुंदर संग्राह्य वाचनीय अंक ऐन दिवाळीत थाटात प्रसिद्ध होणार.

* श्रीसाईभक्तांनी आपापले नवे, ताजे श्रीबाबांच्या बद्दलचे अनुभव कागदाच्या एकाच बाजूस थोडक्यात सुवाच्य लिहून ते **२० आगस्ट १९७९** पर्यंत संपादक श्री साईलीला, 'साईनिकेतन,' ८०४ बी डॉ. आंबेडकर मार्ग, दादर मुंबई ४०० ०१४ या पत्यावर पाठवावेत. वरील तारखेनंतर आलेल्या कोणत्याही मजकुराचा स्वीकार करता येणार नाही.

**प्रसिद्धीची तारीख १५ आक्टोबर १९७९**

**मुखपृष्ठावर** बाबांचे मनोहर चित्र **किंमत सव्वा रुपाया**

# श्रीसाईंचे अद्वितीय योगसामर्थ्य

साधुसंत योगविद्येत पारंगत असतात आणि योगाभ्यास करून ते ब्रह्मानंदात समाधि लावून आपल्या जडदेहातील आत्मा आणि सच्चिदानंद परमेश्वराचे सत्-स्वरूप यांची एकरूपता करतात. योगविद्येचे निरनिराळे प्रकार आणि मार्ग आहेत. फार पुरातन काळापासून अधिकारी व्यक्तींनी योगाचा अभ्यास करून यातील गूढ प्रमेये दाखवून दिली आहेत व उत्तम आणि योग्य शिष्यांना मार्गदर्शन केले आहे. परंतु योगाभ्यासाच्या प्रत्यक्ष कृती आणि त्यापासून होणारे फायदे सर्वसामान्य माणसाला नेहमी पहावयास मिळत नाहीत.

भगवान श्रीसाईबाबा योगाभ्यास करीत होते, इतकेच नव्हे तर ते त्या विद्येत अगदी पूर्णत्वाला पोचलेले होते. शिरडीपासून जरा दूर अंतरावरील वटवृक्षाखाली असलेल्या विहिरीवर तीन दिवसांनी बाबा स्नानास जात असत. अशाच एका प्रसंगी योगविद्येतील एक चमत्कारिक प्रसंग पहावयास मिळाला. स्नानाच्यावेळी आपले सर्वांग साफ करताना बाबांनी आपल्या पोटातील आंतडी बाहेर काढली आणि ती आतून बाहेरून साफ करून जवळच्या जांभूळ वृक्षाच्या फांदीवर सुकवण्यासाठी ठेवून दिली. हा योगविद्येचा प्रकार, शिरडीतील कित्येक लोकांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिला असून त्याच्या खरेपणाबद्दल साक्षी दिल्या आहेत.

योगातील हा धौती प्रकार बहुधा थोड्या निराळया प्रकाराने करतात. स्वच्छ पांढऱ्या पातळ कापडाची तीन इंच रुंद व साडेपंचावन्न फूट लांबीची चिंधी ओली करून ती अन्ननलिकेतून पोटात घालून अर्धा तासपर्यंत आत आतड्यात ठेवून नंतर ती हळूहळू बाहेर काढतात. खरी धौती पद्धती अशी आहे पण बाबांची सर्वच कृती जगावेगळी होती.

या योगविद्येत दुसरा एक खंडयोग म्हणून प्रकार आहे. त्याचाही प्रयोग बाबांनी एकदा केल्याचा पुरावा आहे. एकदा एक सद्‌गृहस्थ द्वारकामाईत बाबांना भेटावयास गेले. पण ते तेथील अत्यंत चमत्कारिक प्रकार पाहून आश्चर्यचकित आणि गर्भगळित झाले. बाबांनी आपले काही अवयव दूर बाजूला काढून ठेवले होते. हे भयंकर प्रकार पाहून ते अक्षरशः घाबरले. आणि वेड्यासारखे धावत धावत गावच्या पोलीस पाटलाकडे निघाले. पण वाटेत हा काही विचित्र प्रकार

असल्यास आपल्यावर भलताच आरोप किंवा आळ येईल अशी शंका मनात येऊन ते तसेच घरी गेले. दुसऱ्या दिवशी द्वारकामाईत बाबांना नेहमीप्रमाणे सुस्थितीत पाहून त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. आदल्या रात्री प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेला भयंकर प्रसंग केवळ स्वप्नच असेल असे समजून ते मूग गिळून बसले. बाबांचा हा खण्डप्रयोग होता. अगदी लहानपणापासून योगातील निरनिराळी आसने आणि प्रयोग करण्याची दीक्षा त्यांना आपल्या व्यंकुशा, व्यंकय्या नावाच्या गुरुपासून मिळालेली होती. या व्यंकय्याचे खरे नाव गोपाळस्वामी असे होते असा काही ठिकाणी उल्लेख सापडतो. निकटचे बाबांचे मित्र श्री नानासाहेब डेंगळे यांनी बाबांना द्वारकामाईत झोपण्याकरिता म्हणून लाकडाची एक फूट रुंद व चार हात लांब अशी एक फळी आणून दिली होती. बाबा तिचा उपयोग झोपाळ्यासारखा करीत. द्वारकामाईच्या वरील खांबाला चार जुन्या कुजक्या कापडाच्या लांब अशा चिंध्या बांधून बाबांनी ती फळी त्यावर लोंबती ठेवली व तिच्या चारही बाजूस पणत्या ठेऊन बाबा नित्यनियमाने तीवर झोपू लागले. चिंध्यांच्या दोऱ्या इतक्या कुजक्या होत्या की नुसत्या फळीचे वजन देखील त्यांना पेलणे शक्य नव्हते. तेव्हा त्या अधांतरी टांगलेल्या फळीवर बाबा कसे काय झोपत असतील याचे आश्चर्य वाटून रोज रात्री द्वारकामाईजवळ हा अद्भुत प्रकार पहाण्याकरिता लोकांची गर्दी जमत असे. कित्येकांनी तर पाळत ठेवून पाहिले पण बाबा त्या फळीवर केव्हा चढून झोपत व केव्हा खाली उतरत याचा कोणालाही पत्ता लागला नाही. पुढेही बाबांची गंमत पहाण्याकरिता फार लोक येऊ लागले, त्यामुळे बाबांना स्वस्थ झोप आणि विश्रांती मिळेनाशी झाली आणि म्हणूनच की काय बाबांनी रागारागाने एके दिवशी ती फळी मोडून फेकून दिली. बाबांच्या सेवेला अष्टसिद्धी तत्पर होत्या. त्यांच्या मदतीनेच ते आपले शरीर वायूप्रमाणे हलके करीत आणि अधांतरी फळीवर झोपणे, उकळत्या तेलाच्या कढईत हात घालून ढवळणे वगैरे आश्चर्यकारक चमत्कार सहज लीलेने करून दाखवीत. अष्टसिध्दी जरी त्यांच्या पूर्णपणे हुकमतीत होत्या तरी स्वार्थबुध्दीने बाबांनी कधीही त्यांचा उपयोग आपल्या स्वतःच्यासाठी करून घेतला नाही. बाबा पूर्णत्वाला पोचलेले अधिकारी सद्गुरु होते.

एकदा योगशास्त्राचा थोडासा अभ्यास केलेला एक विद्यार्थी श्री. नानासाहेब चांदोरकरांचे बरोबर शिरडीला आला. पतंजलीच्या योगसूत्रांचा त्याने अभ्यास केला होता. साईबाबांची सुकीर्ती ऐकून दीर्घसमाधी कशी लावावी याचे शास्त्रोक्त प्रयोग आपणाला पहावयास मिळतील या इच्छेने तो बाबांच्या पुढे जाऊन बसला. साईबाबा त्यावेळेस सकाळची न्याहरी, चटणी भाकर आणि कांदा खात बसले होते.

ते दृश्य पाहून अपवित्र कांदा खाणारा हा फकीर योगशास्त्र ते काय सांगणार अशी शंका त्या मुलाच्या डोक्यात आली. साईंनी तत्क्षणी त्याच्या मनातील विचार जाणून नानांच्याकडे वळून म्हटले, "अरे, नाना, कांदा खाऊन तो पचविण्याची ज्याची शक्ती असेल त्यानेच तो खावा. दुसऱ्यांनी ह्या भानगडीत पडू नये." बाबांचे हे उद्‌गार ऐकून तो बालयोगी मनात खजील झाला, आणि साईंना अनन्यभावे शरण गेला. तेव्हा श्रीसाईंनी त्याला योगशास्त्रातील गुप्तगोष्टींचे ज्ञान करून दिले व त्याच्या मनाचे समाधान केले.

एकदा दीपावलीचा मंगल महोत्सव चालू असताना बाबांनी नेहमीच्या पद्धतीप्रमाणे लाकडे घालून आपली धुनी प्रज्वलित केली; व हात पाय शेकताना एकदम आपला हात धुनीच्या रखरखीत विस्तवात घातला व जाळून घेण्याचा प्रयत्न केला. जवळच बसलेल्या माधव नावाच्या नोकराचे व माधवराव देशपांडे उर्फ शामा यांचे त्या दृश्याकडे लक्ष जाताच प्रसंगावधान राखून अत्यंत तत्परतेने माधवरावांनी पाठीमागून कंबरेला विळखा घालून बाबांना बळजबरीने मागे ओढून घेतले व, "देवा आपण हे काय करून घेतलेत?" असा प्रश्न केला. आपल्या समाधी तंद्रीतून जागे होऊन बाबा म्हणाले, "अरे, माझ्या भक्ताची, एका लोहाराची बायको भट्टीजवळ बसली होती. तिच्या नवऱ्याने हाक मारल्यामुळे ती तत्परतेने जाण्यास निघाली; आणि घाईघाईत हातावर घेतलेले तिचे तान्हे बाळ त्या जळत्या भट्टीत पडले, म्हणून मी घाईने विस्तवात हात घालून त्या बाळाला बाहेर काढले आणि वाचविले. माझे हात भाजले, पोळले. याचे मला दुःख होत नाही. पण त्या अज्ञान कोवळ्या बाळाचे प्राण वाचले हे बरे झाले." भक्तांकडे बाबांचे किती सूक्ष्म लक्ष होते हे या प्रसंगावरून दिसून येते. पुढे बरेच दिवस बाबांनी आपला हात बांधून ठेवला होता.

श्रीसाईबाबा हे अतींद्रिय योगीराज होते. एकाच क्षणाला निरनिराळे देह धारण करून भक्तांना दर्शन दिल्याचे त्यांचे अनेक अनुभव आहेत. योगाभ्यास करून ऋद्धिसिद्धी प्राप्त करून घेतल्यानंतर सिद्ध पुरुषाला ही शक्ती प्राप्त होते. एक दिवस शिरडीला सर्व भक्तमंडळींनी रात्रौ बाबांची नेहमीप्रमाणे शेजारती केली. दुसरे दिवशी ती सर्व मंडळी पुन्हा दर्शनाला गेली असता बाबा म्हणाले, "काल मी दक्षिण दिशेला फिरावयास गेलो होतो." बाबांच्या बोलण्याचा प्रथम कुणालाच अर्थ कळला नाही नुसते आश्चर्य करून ती मंडळी आपली गप्पच बसली. थोड्याच वेळात दक्षिणेच्या बाजूच्यां एका खेड्यातून एक मनुष्य दर्शनाला आला व "काल

संध्याकाळी बाबा आमच्या गावात आले होते." असे सांगू लागला. बाबांच्या बोलण्यातील सुसंगती लक्षात घेऊन सर्वांना एकाच वेळी दोन देह धारण करण्याची बाबांची अतींद्रिय शक्ति प्रत्यक्ष अनुभवण्याची सुवर्णसंधि मिळाली. कोल्हटकरांच्या "श्रीमद्भागवतार्थ दर्शन" या ग्रंथात आत्मा अमर असून त्याला अशा प्रकारचे अनेक चमत्कार करता येतात हे सप्रमाण सिद्ध करून दाखविलेले आहे. श्रीसाई जागृतावस्थेत व स्वप्नावस्थेत निरनिराळे देह धारण करून भक्तांना दर्शन देत असत. एका रात्री श्री. बळवंतराव खापर्डे यांच्या स्वप्नात साईबाबा गेले व भोजन करून स्वस्थपणे झोपाळयावर बसून विडा चघळून निघून गेले. नंतर घरच्या मंडळींच्या आग्रहावरून कुणासही ही हकीकत न सांगता बळवंतराव बाबांच्या दर्शनास गेले. त्यांना पहाता क्षणीच बाबा म्हणाले, "काल तुमच्या घरी पोटभर जेवलो. पण नंतर दक्षिणा दिली नाहीत" असे म्हणाले आणि मग त्यांनी बळवंतरावांकडून दक्षिणा मागून घेतली. परमभक्त श्री. खापर्डेसाहेब यांचा हा अनुभव बाबांच्या गूढ अतींद्रिय शक्तींचा स्पष्ट पुरावा नाही काय ?

खापर्डेसाहेबांच्या प्रमाणेच परमभक्त काकासाहेब दीक्षितांचा अनुभव देखील कुणाचीही मति गुंग करून टाकणारा आहे. एका प्रातःकाळी स्नानसंध्या करून दीक्षितसाहेब ध्यानधारणा करीत बसले होते. त्यावेळेस पंढरपूरच्या श्रीविठोबारायांची सावळी मूर्ती पाहिल्याचा भास त्यांना झाला. आपला जप पूर्ण झाल्यावर काकासाहेब द्वारकामाईत बाबांच्या दर्शनाला गेले. अत्यंत सुहास्य वदनाने त्यांच्याकडे पहात बाबा म्हणाले, "कायरे विठ्ठल पाटील आला होता काय ? त्याला नीट पाहिलेस तरी का ? तो फार लबाड पळपुट्या आहे. चांगला घट्ट धरून ठेव नाहीतर तुझ्या हातावर तुरी देऊन पळून जाईल." बाबांचे हे उद्‌गार ऐकून काकासाहेबांची स्थिती काय झाली असेल याचा आपणच विचार करा. दीक्षितांचे मन गहिवरून आले. त्यांनी बाबांचे चरणी लोटांगण घातले. भोजन करण्याकरिता ते वाड्यात गेले. त्याच सुमारास बाहेरगावाहून एक फेरीवाला देवादिकांची चित्रे विकायास घेऊन आला. बाबांची लीला अगाध आहे. तिचे वर्णन करताना मानवी मन खरेच गोंधळून जाते. फेरीवाल्याजवळ असलेल्या चित्रात काकांना एक विठ्ठलाचे चित्र दिसले. सकाळी पाहिलेल्या ध्यानाच्यावेळी विठ्ठलाचे ते रूप पाहून दीक्षितांनी ताबडतोब बाबांच्या आज्ञेप्रमाणे ते चित्र विकत घेतले, आणि आपल्याकडे नित्य पूजेसाठी ठेवून दिले.

एकदा हरिभक्त परायण दासगणूमहाराज यांना बाबांनी नामसप्ताह सुरू करावयास सांगितले. त्यावर सातव्या दिवशी साक्षात विठोबाचे दर्शन होईल तर

आपण सप्ताह सुरू करतो असे दासगणूंनी उत्तर दिले. तेव्हा बाबांनी लागलीच आपली छाती उघडी करून आत्मविश्वासाने सांगितले की, "अरे वेड्या, विठ्ठल हा येथे बसलेला आहे. त्याला पहावयाचे असेल तर भक्ताने मात्र अत्यंत तळमळ व निष्ठा ठेवली पाहिजे. शिरडी हेच श्रीविठ्ठलाचे पुरातन स्थान आहे." पुढे देव नावाच्या मामलेदारांनी शिरडीचा पुरातन इतिहास शोधण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांना असे आढळून आले की शिरडी, शिलधी हे फार पुरातन खेडे असून जुन्या पंढरपूरच्या क्षेत्रात येते; व कृष्णयुगातील अगदी दक्षिणेचे टोक द्वारका तीच ही शिरडी होय.

श्रीसाई महाराजांना लिहिता वाचता येत नव्हते, असे अनेकांना साहजिकच वाटते कारण बाबांनी स्वतः कधी काही लिहिले नाही किंवा वाचले पण नाही. परंतु ज्या सत्पुरुषाने आत्म्याचे पूर्ण ज्ञान प्राप्त करून घेतले आहे त्याला वर्तमान काळातील इतकेच काय पण भूत-भविष्य काळातील सर्व गोष्टींचे पूर्ण ज्ञान असते. बाबा सर्वज्ञ असल्यामुळे व्यावहारिक दृष्टीने लिहिणे-वाचणे त्यांनी कधीच केले नाही. पण योग्य वेळी योग्य तेच कार्य ते करून दाखवीत असत.

महाराजांच्या योग सामर्थ्याविषयी आणखीन एक कथा पहा तर खरं! वांद्रे येथे राहणारे श्री. रामचंद्र आत्माराम तर्खड नावाचे एक साईभक्त होते. ते दररोज न चुकता बाबांच्या मूर्तीस नैवेद्य दाखविल्याशिवाय भोजन करीत नसत. एकदा त्यांच्या मातोश्रींना शिरडीस जाऊन बाबांचे दर्शन घ्यावे व सोबत म्हणून रामचंद्रास न्यावे अशी इच्छा झाली. पण रामचंद्र तयार होईनात कारण घर सोडून गेल्याने मूर्तीस नैवेद्य कोण दाखविणार? बाबा उपाशी राहतील ही त्यांची कल्पना त्यांच्या डोक्यातून जाईच ना. पण त्यांच्या वडिलांनी ज्यावेळी मी दररोज मूर्तीस नैवेद्य दाखवीन असे आश्वासन दिले. त्यावेळी रामचंद्रपंत जाण्यास तयार झाले. त्यांचे वडील श्री. आत्मारामपंत भायखळा येथील खटाव मिलमध्ये मॅनेजरपदी होते. मुलास सांगितल्याप्रमाणे ते नियमितपणे मूर्तीस नैवेद्य दाखवीत असत. पण एके दिवशी कामाच्या गडबडीमुळे त्यांना घरी येण्यास उशीर झाला व गडबडीत भान न राहून ते नैवेद्य न दाखवताच जेवणास बसले. दुपारी पुन्हा कामावर जाण्यास ते निघाले तो त्यांना लगेच बाबांची आठवण झाली. ते मूर्तीजवळ जाऊन बघतात तो प्रसाद पुढ्यात नाही. ताबडतोब ते मूर्तीजवळ गेले व गुडघे टेकून म्हणाले, "देवा, मोठी चूक झाली. आज नैवेद्य न दाखवताच मी जेवलो. मला क्षमा करा." त्यांना पुढे रहावेचना. त्यांनी शिर्डीस आपल्या मुलाला लगेच पत्र लिहिले.. की आज माझ्या

हातून एक मोठी चूक झाली व त्याबद्दल मी शिक्षेस पात्र आहे. तुझा गुन्हेगार पिता आत्माराम तर्खड अशी सही खाली केली.

इकडे त्याच दिवशी त्याचवेळी रामचंद्र व त्याची आई स्नान आटोपून श्रीबाबांच्या दर्शनास गेली होती बाबा त्यांना सहज म्हणाले, "काय सांगावे, वांद्र्यास तुमच्या घरी गेलो होतो पण तेथून उपाशीच मला यावे लागले." रामचंद्रांच्या मनात शंका आली व तो लगेच पत्र लिहिण्यास बसला. बाबांच्या पुढे त्याने लोटांगण घातले आणि पिता पुत्राना एकमेकांच्या खऱ्याखुऱ्या हकीगतीचे तंतोतंत पत्र मिळाले. आहे की नाही बाबांची ही कमाल ! !

त्यावेळी शिरडीला आलेले यात्रेकरू किंवा श्रीबाबांच्या दर्शनासाठी आलेले भक्त जाताना बाबांना विचारल्याशिवाय, त्यांची परवानगी घेतल्याशिवाय जात नसत. न विचारताच जाणारा बहुधा आजारी पडे किंवा अनेकप्रकारे त्यास काही ना काही त्रास होत असे.

एकावेळच्या शिरडीच्या श्रीसाईबाबा संस्थान कमेटीचे अध्यक्ष श्री. बाजीराव पाटील यांचे वडील श्री. तात्यासाहेब कोते पाटील बाजार करण्यास निघाले होते. कोणत्याही कामास जाण्यापूर्वी बाबांना विचारून जावे हा त्यांचा नियम असे. आजही पाटील घराण्यात ही प्रथा चालू आहे. टांगा बाहेर उभा करून पाटील आत दर्शनास गेले 'बरे, मी जातो' म्हणून ते उठू लागले पण बाबांनी स्पष्ट शब्दात त्यांना सांगितले की, "आज बाजार करण्यास गावाबाहेर जाऊ नकोस." परंतु तात्यांना निकडीचे काम होते. त्यांनी आपली निकड श्रीबाबांच्या जवळ निवेदन केली. तेव्हा तसेच काहीतरी जरूरीचे काम असल्याशिवाय तात्या बाहेर जाणार नाहीत हे बाबांना माहित होते. अर्थात त्यांनी वेळ पाहून जा, पण जातांना सांभाळून जा असा सूचित उपदेश केला. तात्या निघाले खरे पण तात्यांचा घोडा काही केल्या चालेनाच. ज्या घोडयाला अंगावर माशी बसलेली सहन होत नसे तो चलाख घोडा एकाएकी खाली बसला तो काही केल्या उठेचना. तात्यांना लगेच बाबांची आठवण झाली व बाका वेळ पाहून ते श्रीकृपेने घरी परतले.

एकदा असेच तात्या बाहेर जाण्यास निघाले असताना श्रीबाबांच्या दर्शनास ते गेले व "जातो" म्हणून बाबांच्या उत्तराची वाट न पहाता चालू लागले. टांग्यात ते बसण्यापूर्वीच टांगा बेफाम धावू लागला व सरते शेवटी एका मोठ्या दगडावर

जाऊन तो आदळला. त्याचा चक्काचूर झाला. इजा कुणास झाली नाही. बाबांची अनुमती न घेता कोणतीही गोष्ट केल्याचा हा परिणाम होय.

काकासाहेब दीक्षितांची कन्या वारली तेव्हा काकांना अतीव दुःख झाले. सहाजिकच आहे. कोणत्याही गोष्टीत त्यावेळी काकांचे मन रमत नव्हते. बाबांच्या समोर अत्यंत विषण्ण मनाने खाली मान घालून काकासाहेब बसले होते. अगदी याच सुमारास दीक्षितांच्या नावे पोस्टमन एक व्ही. पी. घेऊन आला. भावार्थ रामायणाची प्रत दीक्षितांनी मागविली होती. ती आली होती. ते पुस्तक वाचण्यास आरंभ करण्यापूर्वी दीक्षितांनी ते बाबांच्या हातात दिले. बाबांनी ते पुस्तक उलटे हातात धरून थोडा वेळ चाळले व शेवटी किष्किंधाकांडातील वालीचा वध झाल्यावर तारा शोक करीत असता रामाने जो उपदेश केला. नेमके तेच प्रकरण काढून ते दीक्षितांना वाचावयास सांगितले. दीक्षितांच्या त्यावेळच्या मनस्थितीला अत्यंत सुयोग्य असे प्रकरण काढून बाबांनी योगसामर्थ्याचा साक्षात्कार दाखविला होता.

१९१८ च्या सुमारास बापूशास्त्री गुळवे हे बाबांच्या दर्शनास गेले. त्यांनी काशीहून पवित्र गंगानदीचे तीर्थ आणले होते. शास्त्रीबुवांनी गंगेच्या पवित्र जलाने शास्त्रोक्त पद्धतीने बाबांना अभिषेक केला व श्रीरामदासनवमीला सज्जनगडावर जाण्याची परवानगी मागितली. तेव्हा बाबांनी "अवश्य जा, तेथे मीच आहे." असे सांगितले. शास्त्रीबुवा सज्जनगडावर गेले व दासनवमीच्या दिवशी भल्या पहाटेस पाच वाजण्याच्या सुमारास बुवाना साईबाबांनी साक्षात् दर्शन दिले व आपले पाय दाबण्यास सांगितले. थोडावेळ त्यांचेकडून सेवा करून घेतल्यावर बाबा तेथून अदृश्य झाले !

योगिक बलाने बाबांनी प्रत्यक्ष देहाने भक्तांना भेट दिल्याची अशी कितीतरी उदाहरणे दाखवून देता येतील. परमभक्त देव मामलेदार यांच्या घरी भोजन केल्याची बाबांची हकीकत तर मनाला चटका लावणारी आहे. देव मामलेदार डहाणूला असताना त्यांचेकडे एका व्रताचे उद्यापन होते. या निमित्याने आपल्या घरी श्रीसाईदासांचे चरणकमल लागावेत या सद्हेतूने देवांनी बापूसाहेब जोग यांना शिरडीस पत्र लिहून कळविले. ते त्यांनी बाबांना वाचवून दाखविले व देवांची इच्छा कळविली. उलटपत्री उत्तर म्हणून बाबांनी, "आपण भोजनास दोघा मित्राना घेऊन अवश्य येऊ" असे लिहिले. ते वाचून देवांना फार आनंद झाला. प्रत्यक्ष उद्यापनाच्या दिवशी एक बंगाली संन्यासी गोशाळेची वर्गणी गोळा करण्याच्या निमित्याने

म्हणूनला आला. देवानी त्याची योग्य ती संभावना करून पुढे केव्हातरी या असे सांगितले पण त्या संन्याशाने आता वर्गणी मला नको आहे पुढे मी येईनच आता आपल्या घरी कार्यक्रम आहे तर मी येथे जेवून जाईन; पण मजबरोबर दोन मित्र आहेत त्यांना घेऊन येतो असे सांगितले. भोजनाच्या ऐनवेळी ते तिघेही जण यथेच्छ भोजन करून निरोप घेऊन गेले.

इकडे देव मामलेदार साईमहाराज कबूल करूनही आले नाहीत म्हणून फार खट्टू झाले. त्यांनी शिरडीला श्री. जोगांना पत्र लिहिले. बाबांना ते वाचून दाखविताच बाबा हसून जोगांना म्हणाले, "अरे कबूल केल्याप्रमाणे मी माझ्या दोन संन्यासी मित्राना घेऊन देवांच्या घरी गेलो होतो व अगदी भरपेट जेवून आलो; पण मला तेथल्या मंडळींनी ओळखलेच नाही. त्याला मी काय करू ? उद्यापनाच्या दिवशी देवांच्या घरी तिघे संन्यासी जेवले की नाहीत याबद्दल पत्र लिहून खात्री करून घे." श्री. जोगांनी पाठविलेले वरील हकीकतीचे पत्र वाचून देवाना खूपखूप आनंद झाला खरा पण आपण घरी आलेल्या बाबांना ओळखले कसे नाही याचे तितकेच दुःख झाले.

एखादा भक्त बाबांच्या सेवेला बरेच दिवस राहाण्याचा निश्चय करून जाई पण बाबा त्याला क्षणभरही तेथे राहू न देता तावडतोब उलट गाडीने परत जाण्यास सांगत. मुंबईच्या हायकोर्टात नोकरीला असलेले कै. बाळाराम वगळ हे शिरडीला काही दिवस रहाण्याच्या इच्छेने गेले; पण बाबांनी त्यांना लौकरच परत जाण्यास सांगितले. बाळारामपंताना याचे फार वाईट वाटले; पण बाबांच्यावरील पूर्ण श्रद्धेने ते त्याच पावली परत जाण्यास निघाले. पहाटेच्या सुमारास ते मुंबईस परत येऊन पाहातात तो तिथे एकच गोंधळ माजलेला. त्यांचा वडील मुलगा अत्यवस्थ स्थितीत होता व घरची मंडळी त्यांना तार करण्याच्या गडबडीत होती. मुंबईस घडलेला प्रकार आपल्या योगिक बळाच्या अंतर्ज्ञानाने जाणून बाबांनी बाळारामपंतांना अशा प्रकारे तातडीने परत पाठवून दिले होते.

श्रीसाईबाबांनी आपल्या अचाट योगबळाचे सामर्थ्यावर तीन दिवस ब्रह्मांडी आत्मा चढविला होता ती एक मोठी चमत्कारिक गोष्ट आहे.

बाबांना दम्याचा विकार झाला होता. त्याचा जोर अतिशय वाढला. तेव्हा हा देहभोग सहन करण्यासाठी बाबांनी 'ब्रह्मांडी आत्मा चढविला' आपले एक निकट भक्त श्रीम्हाळसापतींना बाबा म्हणाले, "मी ब्रह्मांडी प्राण नेतो आहे"

कोणताही अंदेशा मनात न धरता तीन दिवस मला सभामंडपातील या कोपऱ्यात समाधी लावून ठेवून द्या. त्या ठिकाणी दोन निशाणे लावून ठेवा.

आणि असे म्हणता म्हणता बाबांनी ब्रह्मांडी प्राण चढविला. रात्रीचे दहा वाजले होते त्यावेळी. जमलेले सगळे लोक अगदी चकीत होऊन गेले होते. श्वास नव्हता, त्यांची नाडी चालत नव्हती. कुडी सोडून बाबा गेले. असेच सर्वांना वाटले. सबंध गाव गोळा झाला. बाबांनी समाधी खोदण्याची आज्ञा दिली होती, परंतु तसे करायचा धीर कोणाला होईना. म्हाळसापतींनी बाबांचे डोके मांडीवर घेतले होते. लोकाना असे वाटले की आपल्या आकस्मिक देहपाताने भक्तांना एकदम मोठा धक्का बसेल म्हणून बाबांनी तीन दिवस आपल्याला राखण्याचा आदेश दिला असवा. दोन दिवस झाले. मौलवी फकीर आले, प्रतिष्ठित गावकरी आले. सर्वांनी विचार केला की बाबांनी खात्रीने इहलोक सोडला. तेव्हा त्यांची उत्तरक्रिया करणे योग्य. पण काही निष्ठावान भक्तांना हे म्हणणे मान्य झाले नाही. तीन दिवस आपला देह रक्षण करण्याची आज्ञा बाबांनी दिली आहे, ती कटाक्षाने पालन झालीच पाहिजे असे त्यांचे आग्रहाचे म्हणणे पडले.

होता होता तीन दिवस पूर्ण झाले. पहाटे तीन वाजता बाबांच्या देहात चेतना येताना आढळली. हळूहळू बाबांनी अंगाला आळेपिळे दिले. डोळे उघडले आणि प्रसन्न वदनाने ते उठून बसले.

बाबांची ही अनाकलनीय लीला पाहून नंतर भक्तांच्या आनंदाला जो पूर आला, जयजयकाराचा जो शब्द उमटला, आणि बाबांच्या दर्शनासाठी जी रीघ लागली ते सारे अवर्णनीय आहे.

बाबांनी आपल्या योगबळाच्या सामर्थ्यावर आत्मा काही काळ निचेष्ट केला होता व तीन दिवसानंतर पुन्हा त्याची हालचाल केली होती.

अशा आहेत या श्रीसाईबाबांच्या अचाट योगलीला.

श्रीसाईबाबांनी स्वतःच्या देहपाताची अचूक वेळसुद्धा आपल्या अचाट योगबलाच्या सहाय्याने ओळखली होती. बाबांना जन्मजातच अष्टसिद्धींची प्राप्ती होती. आपल्या उदीच्या महा प्रभावाने त्यांनी आपल्या अनेक भक्तांच्या व्याधी, कुष्ठादी महारोग, तसेच अनेक संकटे निवारण केली, ती देखील याच अष्टसिद्धींच्या जोरावर, बळावर! अणिमा, महिमा, गरिमा, लघिमा, प्राप्ती, प्राकम्य, ईशित्व आणि वेशित्व या अष्टसिद्धी बाबांच्या समोर सदासर्वकाळ हात जोडून सेवेस उभ्या होत्या.

त्यांच्या सहाय्याने बाबांना परमाणूइतके लहान होता येत होते, व पर्वताएवढेसुद्ध मोठे होता येत होते. पृथ्वीएवढे आपले शरीर जड करता येत होते. विश्वातील कोणत्याही वस्तूवर आपले स्वामित्व गाजविता येत होते. हवी ती वस्तू प्राप्त करता येत होती. सर्व दृष्ट वस्तूवर त्यांची सत्ता चालत होती आणि सर्व भूते त्यांना वश होऊन राहिली होती. अशा परिस्थितीत कोणता चमत्कार त्यांच्या कक्षेबाहेरचा होता ? आणि आज जरी बाबा देहस्थितीत वावरत नसले तरी त्यांचे अस्तित्व सिद्ध होण्याजोगे अनेक चमत्कार अजूनही घडतात हे अजिबात नाकारता येणार नाही.

---

## उदी–प्रसाद पाठविण्याची नवी पद्धत

श्री साईबाबा संस्थानला देणगी पाठविणारांना दिनांक ३१–१२ ७८ पूर्वी कापडी पिशवींत उदी-प्रसाद व देणगी पावती टाकून त्यांस पत्ता लिहीलेले लेबल लावून पोस्टाने पाठविण्याची पद्धत होती परंतु या पद्धतीत लेबल तुटून, प्रसाद व पावती भक्तांपर्यंत न पोहचता मध्येच गहाळ होत असल्याच्या अनेक तक्रारी आल्यावरून उदी-प्रसाद पाठविण्याचे बाबतीत सुधारणा करून दि. १–१–७९ पासून पाकिटांत प्लॅस्टीक पिशवीत उदी व प्रसाद टाकून तो भक्तांना पाठविला जातो. मनिऑर्डर द्वारा रक्कम पाठविणारांना मनिऑर्डरची पोच पावती पोस्टा-द्वारा मिळत असल्यानें संस्थानची वेगळी देणगी पावती पाठविण्याचे बंद केलेले आहे व सदरची रक्कम इकडे हिशेबांत घेतलेबद्दलचा नंबर मनिऑर्डरचे पावतीवर व उदी-प्रसादाचे पाकिटावर स्टॅम्पींग मशिननें दिला जातो व भक्तांच्या इच्छेप्रमाणे रक्कम ज्या त्या कारणासाठीं जमा करण्याची दक्षता घेतली जाते.

साईभक्त याबाबत सहकार्य करतील अशी आशा आहे.

**क. हि. काकरे**
कोर्ट रिसीव्हर,
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी.

# श्रीसाईनाथांच्या अजब लीला

● श्रीसाईबाबा हे अलौकिक शक्तीचे महात्मा होते. ते स्वतःला ईश्वराचा बंदा सेवक म्हणवीत असत. आपल्या हातून जे चमत्कार घडतात ते देव आपल्याकडून घडवितो व त्या देवाच्या लीला होत असे ते सांगत म्हणून बाबांनी स्वतःला गुरू मानून आपले शिष्य केले नाहीत. जे होते व हल्ली आहेत ते त्यांचे केवळ भक्त होत.

श्रीसाई दररोज द्वारकामाईत व शिरडी गावातील इतर देवळांतून दिवे लावीत. सर्वत्र दिव्यांची आरास करण्याचा त्यांना भारी कैफ होता. या दिव्यांसाठी ते तेली व वाणी यांच्याकडून तेल मागून आणीत असत. त्यावेळी गावातील लोक बाबांना एक वेडा फकीरच समजत. तेली-वाणी यांनी काही दिवस या वेड्या फकीराला गंमत म्हणून तेल दिले. पण पुढे पुढे त्यांना त्यांचा अगदी वैताग आला. रोज फुकटच्या फाकट किती म्हणून व कां म्हणून तेल द्यायचे! एके दिवशी या वेड्याची चांगलीच जिरवावी म्हणून त्यांनी त्यांना तेल देण्याचे साफ नाकारले. बाबा काहीएक न बोलता द्वारकामाईत परत आले. त्यांनी तेलाच्या टमरेलात थोडे पाणी ओतले व ते पिऊन टाकले. जणू काही त्यांनी आपल्या हृदयातल्या ईश्वरालाच संतुष्ट केले. मग त्यांनी तेच टमरेल भरून पाणी घेतले व ते पण त्यांतून ओतले. नंतर त्यात काकडे घालून त्यांना काडी लावली. तो काय आश्चर्य! त्या सर्वच्या सर्व पणत्या नेहमी तेल घातल्याप्रमाणे पेटू लागल्या! गावकरी लोक तिथे जमून बाबांचे हे वेडे चाळे हात होते ते या प्रकाराने अगदी चकीत होऊन गेले. त्या रात्री पाण्याने भरलेल्या त्या पणत्या रात्रभर जळत राहिल्या. बाबांची ही विलक्षण शक्ति व अचाट लीला सर्वांनाच दिसून आली. काही लोक तर महाराजांची अवहेलना करीत, ते तर खूपच घाबरले. ते बाबांची क्षमा मागू लागले. पण बाबा पूर्ण दयाळू, अपकार करणाऱ्यांची-सुद्धा उपेक्षा करावयाची नाही पण त्यांच्यावरही उपकारच करावयाचा हे बाबांचे ब्रीद. तेव्हा अर्थात्च कुणालाही भिण्याचे कारण नव्हते. सर्व लोकांवर बाबांचे पुत्रवत प्रेम असून त्यांचे प्रतिपालन ते करीत असत. बाबांची शिरडीतील आणखीन एक अगम्य लीला पहा.

## दळणाची लीला

शिर्डीत १९१० साली एक मोठा चमत्कारीक प्रसंग घडून आला. एक दिवस बाबा द्वारकामाईत जात्यात गव्हाचे दळण दळत बसले होते. बाबा दळतांना पाहून

तेथे हजर असलेल्या सर्व लोकांना खूपच आश्चर्य वाटले. पण बाबांना विचारण्याची कुणाचीही छाती झाली नाही. थोड्या वेळाने ही बातमी शिरडी गावात पसरली आणि चार सुवासिनी स्त्रिया धावत धावत द्वारकामाईत आल्या आणि तडक आत जाऊन बाबांना बाजूला करून त्या चौघीजणी स्वतः ओव्या गात गहू दळीत बसल्या. प्रथम बाबांना राग आला. पण त्या बायकांची भक्ती व प्रेम पाहून बाबा बाजूला सरून गप्प बसले. बाबा ते पीठ सर्वांना वाटून टाकतील तेव्हा त्यांनीच त्या पिठाचे चार सारखे हिस्से केले व प्रत्येक स्त्री आपला भाग गोळा करू लागली. हे पाहून इतका वेळ गप्प बसलेले बाबा कोपायमान झाले, आणि बाबांनी शेलक्या शब्दात त्यांचा उद्धार करून चार लोकांच्या समोर त्यांची चांगलीच संभावना केली. मनात खजिल झालेल्या त्या स्त्रियांनी बाबांच्या आज्ञेप्रमाणे सर्व पीठ गावाबाहेर ओतून टाकले. त्यावेळेस शिरडी गावाजवळ महामारीचा भयंकर रोग जोराने पसरत होता. आपल्या गावात त्या रोगाची लागण होऊ नये म्हणून बाबांनी पिठाचा हा तोडगा केला होता. गावाबाहेर वेशीवर पीठ अशाप्रकारे टाकून बाबांनी दिशाबंधन केले होते आणि खरोखरीच त्या तोडग्याचा चमत्कार असा झाला की शिरडी गावात महामारीची साथ आलीच नाही. बाबांनी महामारीला जात्यावर दळून टाकले आणि दळलेले पीठ शिव-ओहोळात टाकून दिले होते. याचाच अर्थ महामारीची साथ शिरडीत शिरली नाही.

श्रीसाईबाबानी असे अनेक चमत्कार आपल्या सिद्धीच्या बळावर केले आणि शिर्डीवर येणारी तसेच आपल्या भक्तांवर कोसळणारी संकटे दूर केली. रोज काहीना काही चमत्कार केल्याशिवाय त्यांची दिनचर्या संपत नसे हे बाबांचे विशेष होय.

## दळण्याची आणखीन एक लीला

इ. स. १९१६ साली मे महिन्यात बाबांचे एक निस्सीम भक्त शिरडीस बाबांच्या दर्शनासाठी आले होते. ते मशिदीत जातात तो त्यांना असे दिसले की बाबा इतर दोन स्त्रियांबरोबर गहू दळीत बसले आहेत. त्यापैकी एका स्त्रीचे नाव होते जमालबाई. त्यावेळी त्या ठिकाणी झालेला संवाद म्हणजे बाबांची आणखीन एक लीलाच म्हणावी लागेल.

"बाबा! मला जात्याला हात लावू द्या ना!"

"आये तू थकशील."

" बाबा ! मला होईल तितकेही आनंदाने दळीन "

" बरे आये. "

असे म्हणून जात्यावर दळत असलेल्या लक्ष्मीस बाजूला होण्यास सांगून बाबा स्वतः, जमालबाई व ही विनंती करणारी स्त्री अशी दळायला बसली. दळता दळता त्या स्त्रीने विचारले, " बाबा ! हे गहू तुम्ही का बरे दळता आहांत ! "

" आये ! कधी कधी त्याच्या पिठाच्या भाकरी करून बाळगोपाळ मंडळीना खाऊ घालावेसे वाटते म्हणून. "

" पण बाबा, कधी कधी पीठ शिवेच्या ओढ्यावर तुम्ही नेऊन टाकता ते का ? "

" आये, कधी कधी त्या आकाबाईचा फेरा इथे येत असतो. ती त्या ओढ्यावर बसून माझा लई काळा वाळा करते की, मला गावात येऊ दे. तेव्हा तिला खाऊ घालावे लागते ना ? "

" बाबा, ही जरीमरी दैवते आहेत काय ? "

" होय आये, ही हलकी दैवते आहेत, पण ती आपल्याला काही बी करणार नाहीत. "

" मग जरीमरी गावात आल्याने काही माणसे वाख्याने मरतात ते कसे काय ? "

" आये, ती मला लई शिवा देती. तेव्हा मी देवाला पुसतू आणि त्याचा हुकूम घेऊन मोजकीच माणसे तिला नेण्याला सांगतो. "

" तर बाबा भुते खेते आहेत ती खरीतरी का ? "

"होय आये ! आहेत तर ! पण ती कधी आपल्या वाटेस जायची नाहीत. "

" बाबा, आम्ही नायगावला राहात होतो तेव्हा तिथे एक पुरुष रोज तिन्हीसांजेचा विहिरीच्या बाजूकडून येऊन पायऱ्या चढून एका खोलीत जात असे व तिथे नाहीसा होत असे. "

" आये त्याला मी ओळखतो ! तो त्या घराचा मालक होता ! आणि ज्या खोलीत तू बाळंत झालीस त्याच खोलीत तो नाहिसा होत असतो ना ? "

" बाबा ! तुम्हाला कसे हो हे सारे माहित ? "

" आये ! तू लहान होतीस तेव्हापासून मी तुला ओळखतो. आये, तू मला विसरली होतीस. मग तुला इकडे बुलावून मी आणली. अग ! माझे बाळगोपाळ

जरी हजारो कोसावर असले तरी मी त्यांना जवळ बोलावून आणीत असतो. माझी नजर सगळ्यांवर सारखी आहे आये! खटनट, सुष्ट, दुष्ट सगळ्या तऱ्हेची माणसे आपल्या दरबारात येतात. त्या सगळ्यांवर मला सारखी नजर ठेवावी लागते ना!" इतके संभाषण होईतोपर्यंत ती स्त्री थकली. हे पाहून बाबा म्हणाले, "आये, तू आता दमलीस. आता या बाईला जात्याला हात लावू दे."

तेव्हा ती दूर सरली आणि बाबा, जमालबाई व लक्ष्मीबाई अशा तिघांनी भरभर जाते चालवून तासाभरात ते सर्व गहू दळले.

★

## नांदा सौख्यभरे

श्री. अवधूतराव उर्फ बाबासाहेब शिंदे, निवासस्थाने प्रमुख श्रीसाईबाबा संस्थान शिरडी, यांची ज्येष्ठ कन्या पुष्पलता उर्फ ज्योत्स्ना हिचा विवाह श्री मेघःशाम गोविंदराव पाटील यांजबरोबर १० मे ७९ रोजी सकाळी ११-४९ वा. चे शुभ मुहूर्तावर शिरडी येथील सेवाधाम चौकांत थाटाने साजरा झाला. वधुवराना शुभाशिर्वाद देण्यासाठी मुंबई-पुण्याहून असंख्य साईभक्तप्रेमी, तसेच मुंबईच्या सिटी सिव्हिल कोर्टाचे न्या. श्री. पारेख साहेब, श्री. तलगिरी साहेब, रिसिव्हर श्री. काकरे साहेब, शासकीय अधिक्षक श्री. पाठकसाहेब इ. मान्यवर मंडळी हजर होती.

# काशीराम शिंपीची अजब कथा

## त्या भीषण संकटातून बाबांनीच त्याची सुटका केली !

● तरुण श्रीसाईबाबा जेव्हा शिरडीत आले तेव्हा म्हाळसापती, आप्पा जागले व काशीराम शिंपी हेच त्यांचे सुरुवातीचे ओळखीचे भक्त होते. हे तिघेही जण बाबांची सेवा करीत असत. काशीराम हा कापडविक्याचा धंदा करीत असे. तो निरनिराळ्या गावी बाजाराच्या दिवशी दुकान घाली.

शिरडीच्या जवळच्याच नाऊर या गावी त्याने बाजाराच्या दिवशी दुकान घातले होते. एकदा या नाऊरच्या बाजाराहून परत येताना काही लुटारू भिल्लांशी त्याची गाठ पडली, पण त्याच्या जीवावर कोसळलेल्या त्या भीषण आपत्तीतून बाबांनी त्याची कशी काय सुटका केली ती हकीकत खरोखरीच वाचण्यासारखी आहे. बाबा शिरडीत तर काशीराम नाऊरच्या जंगलात, पण बाबांनी आपल्या दिव्यचक्षूने आपल्या भक्ताला काशीरामला वाचविले हे अजबच म्हणावयास हवे.

काशीराम नित्याप्रमाणे बाजाराला जाई, कपडा विकी व येतील ते पैसे बाबांना देत असे. एकदा याच विचाराने तो नाऊरला गेला. त्या दिवशी कापड विकून त्याचा खूप फायदा पण झाला. सुमारे ऐंशी नव्वद रुपये त्यास मिळाले. तो आनंदाने घरची वाट चालू लागला. एवढी रक्कम एकदम बाबांना दिली की पुन्हा दोन-तीन महिने पहायला नको असे त्याला वाटले. त्याने हळूहळू आपला घोडा शिरडीच्या दिशेला वळविला. त्या दिवशी काशीरामने चितळीच्या जंगलातून जाण्याचे ठरविले. त्या काळी वाहतुकीचे साधन म्हणजे घोडाच असे. काशीराम ज्या चितळीच्या जंगलातून जाणार होता ते अतिशय दाट होते. तिथे साग, वड, पिंपळ, शेवरी, अर्जुन, सावडा, बोरी अशा अनेक झाडांची दाटी होती व अशा या दाट जंगलातून वाघ, अस्वल आणि लांडगे इत्यादी क्रुर श्वापदे तिथे दिवसासुद्धा वावरत असत आणि हल्ला करीत. या खेरीज वाटमांऱ्या आणि दरोडेखोरांची तर खूपच भीती असायची ती वेगळीच. शिरडीला लौकरात लौकर पोचणारा हाच काय तो एक मार्ग त्याकाळी होता. म्हणून काशीरामने धोका पत्करुनही बाबांच्याकडे लौकर जाण्याचे ठरविले होते. परंतु तेव्हा काशीरामच्या मनात कशाचाच विचार शिवला नाही. बाबांच्याकडे कधी एकदा लौकरात लौकर जाऊन पोचतो व कधी एवदा त्यांना पैसे देतो असे त्याला झाले होते. पैसे नसले की बाबांना

तेल मिळणार नाही आणि मग त्यांची द्वारकामाई उजळणार नाही ही गोष्ट त्याच्या जीवाला लागून राहिली होती. शिवाय बाबांचा आशीर्वाद पाठीशी असताना त्या जंगलामधे आपल्यावर काहीच संकट येणार नाही अशी त्याची नितांत श्रद्धा होती. चितळीच्या जंगलातून गेले की शिर्डीची वाट लौकर गाठता येते म्हणून या रस्त्याने तो आला होता.

थोडीशी वाट चालून गेल्यावर एकाएकी त्या गर्द अंधारात त्याच्यापुढे एक संकट दत्त म्हणून उभे राहिले. क्रूर चेहऱ्याच्या व आडदांड शरीरयष्टीच्या भिल्ल, रामोशी दरोडेखोरांनी त्यास अडविले. त्यांच्या हातात धारदार चकाकणाऱ्या पात्याच्या कुऱ्हाडी व कोयते होते पण काशीरामला त्याचे भय वाटले नाही. तो मनात बाबांचे स्मरण करीत होता. त्याला एका भिल्लाने सवाल केला, "ए तुझ्या गाठोड्यात काय काय हाय ते गुमान आम्हास्नी दे!" "ऐंशी रुपये आहेत– हे घ्या." त्याचे ते निर्भय उत्तर ऐकून रामोशी चकीत झाले. कारण त्यांना पाहून त्या भयंकर जंगलात आणि रात्रीच्या वेळीही काशीरामला दरदरून घाम सुटला नव्हता. ते पाहून रामोशांच्या नाईकाने त्याला दुसरा प्रश्न केला, "काय रे काय इचार हाय तुझा? रातच्या पहरी या जंगलात आमचं भय नाय वाटत व्हय तुला!" "भय कशाचं नाईक, तुम्ही पण माणसंच हायत नव्ह का!"

"वाल्या कोळी पण भिल्ल होता. तुमच्यासारखीच वाटमारी करून तो पोट भरीत असे. एक दिवस नारद त्याच्या वाटेने चालले होते. वाल्याने नारदाच्या गळयावर कुऱ्हाड धरली. नारद काही भ्याले नाहीत. ते हंसतच नम्रतेने म्हणाले, 'वाल्होजी, माझा जीव घेणार आहेस तर खुशाल घे, पण हे खरे सत्कृत्य करून ज्यांचे मन तू सुखवू पाहात आहेस त्या तुझ्या बायका पोरांना एकदा विचारून येशील का की तू करीत असलेल्या या पापांचे वाटेकरी ते पण होणार आहेत का? वाल्याने तसे जाऊन विचारलं तेव्हा बायकापोरं म्हणाली, 'नाही बा. तुम्ही पाप करता त्याचा वाटा आम्ही काय म्हणून उचलावा?' झालं वाल्याचे डोळे खाडकन उघडले आणि वाल्याकोळी वाल्मिकी ऋषी झाला."

पण या सर्व पुराणकीर्तनाचा त्या भिल्लांवर काहीच परिणाम झाला नाही.

"अरं, त्याच्या काय नादी लागलाय. त्यानं ती दुसरी पुरचुंडी लपवलीय हाय पगा खाकत," दुसरा एक रामोशी म्हणाला. वास्तविक पुरचुंडी म्हणजे काशीरामची मुंग्यांना घालावयाची साखर होती. काशीरामला जानकीदासबाबा नावाच्या एका

भक्तानं सांगितलं होतं की मुंग्यांना साखर घालत जा. म्हणून तो नेहमी साखरेची पुरचुंडी जवळ बाळगीत असे. पण त्या भिल्लांची खात्री झाली की काशीरामच्या त्या मुटकुळीत काहीना काहीतरी चांदीसोन्याचा डाग ठेवलेला असला पाहिजे. सारे भिल्ल एकदम चवताळले की काशीराम काखेतली मुटकुळी देईना म्हणून, तेव्हा काळभैरवाचा जयघोष करीत ते काशीरामवर तुटून पडले.

पण याच सुमारात शिर्डीस द्वारकामाईत काय चालले होते ? साईबाबांनी भयानक रुद्रावतार धारण केला होता. मशिदीच्या भिंतीवर आणि खांबावर हातातल्या सटक्याचे दणके हाणीत ते ओरडत होते. "चालती हो चांडाळणी – चालती हो इथून. माझ्यासमोर आलीस तर धुनीत फेकून राख करीन तुझी. साखर खाऊन माजल्यात रांडा. साखर खायची आहे नाही का– साखर, खा साखर !" बाबांच्या हाताचे सटके बसताच सगळी मशीदमाई हादरून निघाली. भिंती थरथरा कापू लागल्या. खांब गदागदा हालू लागले आणि चहूबाजूने बाबांच्या सभोवती जणू मुंग्यांचा पाऊस कोसळू लागला. शिरडीतल्याच नव्हे तर साऱ्या ब्रम्हांडातल्या मुंग्या बाबांच्या तीन खणी मशिदीत रहात होत्या की काय असे एखाद्यास वाटले असते. बाबांच्या हुंकारांनी आणि सटक्यांच्या दणदणाटाने म्हाळसापती, शामा, आप्पा, जागले यांच्या अंगाला दरदरून घाम सुटला. बाबांचा हा असा एवढा रुद्रावतार ते प्रथमतःच पाहात होते. बाबांना असं एकाएकी काय झाले ? आणि बाबांना आता आवरावे तरी कसे ? काहीच त्यांना कळेना. त्यांच्या तोंडचे पाणीच पळाले. आणि काय आश्चर्य ! मशिदीत अवतीर्ण झालेल्या मुंग्यांना पाहता पाहता पंख फुटले आणि एखादी टोळधाड गावावरुन उडत जावी त्याप्रमाणे त्या साऱ्याच्या साऱ्या मुंग्या तेथून क्षणार्धात उडून निघून गेल्या आणि चितळीच्या जंगलावर त्यांनी हल्ला चढविला.

काशीरामची गठडी एक भिल्ल सोडत होता व त्याची तलवार खाली पडली होती; तिकडे काशीरामचे लक्ष जाऊन त्याने ती उचलली व त्या चोरापैकी दोघांना त्याने जागच्या जागीच ठार केले. इतक्यात तिसऱ्या भिल्लाने मागाहून येऊन कुऱ्हाडीचा घाव त्याच्या डोक्यावर घातला. त्याबरोबर काशीराम बेशुद्ध पडला. इतक्यात घों घों करून पंख फुटलेल्या त्या मुंग्यांनी कुऱ्हाडीचा घाव चालविणाऱ्या त्या भैरव भिल्लाच्या तोंडावर झेप घेतली. इंगळासारखे लालभडक डोळे व जहाल विषानं भरलेल्या त्यांच्या नांग्या होत्या. मेलो, मेलो, मेलो, असा चीत्कार फोडून भैरव भिल्ल हातातून निसटलेल्या आपल्या स्वतःच्या कुऱ्हाडीवरच कोसळला. बाकीचे

भिल्ल या साऱ्या प्रकाराने भयभीत झाले व त्यांनी काशीरामचा प्राणांत झाला आहे असे समजून तिकडून मोठ्या जिकीरीने पोबारा केला. पण काशिराम बेशुद्ध होऊन प्रेतवत पडला होता; निपचित होता.

दुसऱ्या दिवशी दुपारी बाबांच्या द्वारकामाईपुढे एक बैलगाडी येऊन उभी राहिली. बाबा धुनीपुढे शांत होऊन बसले होते. तिथूनच ते ओरडले, "ए गाडी-वाली बये, कुणाचा मुडदा आणला हायस माझ्या दारात ?"

सीता बेरड नावाची एक जवान कोल्हाटीण होती ती. नित्याप्रमाणे चुली-साठी काटक्या कुटक्या वेचत असताना जंगलात जखमी अवस्थेत पडलेल्या काशीरामला तिने पहाटे पाहिले होते व मग त्याची दया येऊन तिने गाडी जुंपून काशीरामच्या आग्रहामुळे त्याला बाबांकडे सोडले होते. परोपकार करायला गेली पण शिरडीत शिरताच स्वतःचे सत्व हरण करून ती बसली. चितळीच्या जंगलातली भिल्लांची सामुदायिक रखेली म्हणून ती आजवर ओळखली जात होती व त्यांच्याच पैशाआडक्यावर ती दिवस कंठीत होती. आपल्या भरदार जवानीचा मोबदला देऊन तिच्या पदरात काय पडले होते तर आडदांड भिल्लांच्या चार लाथा व तोंडात ताडीमाडीचे घुटके.

बाबांचे दर्शन घडताच सीतेच्या मनाचा कायापालट झला. बाबांनी तिच्या कपाळाला धुनीतली मूठभर उदी लावली आणि ते म्हणाले, "चांडाळणी, हा देह चांगल्या कामाला लाव. रांडे, जन्माला आलीस ते नागव्याने व उद्या मसणवटीत जाशील ते पण नागव्याने. जीव आहे कुडीत तवर नेकीने वाग. शिंदळकी करून देवानं दिलेलं हे सोन्यासारखं शरीर जाळून त्याची राख करू नकोस !"

सीता बेरड जन्मानं कोल्हाटीण होती. पण बाबांच्या उपदेशानं तिनं तमासगीर नारायण कान्हेगावकरांच्या फडात जागा मिळविली. देवादिकांचा कलगीतुरा तिच्याच गळ्यातनं ऐकावा असा तमासगिरात तिचा नावलौकीक होता. ती कुठंही असो पण वर्षातनं एकदा बाबांच्या दरबारात येऊन तिनं हजेरी दिली नाही असं झालं नाही. मरेपर्यंत तिने हा नियम पाळला होता.

बाबांच्याकडे आल्यानंतर जखमी काशीराम आठ पंधरा दिवस बिछान्यात पडून होता. साक्षात बाबांनी त्याची सेवाशुश्रुषा केली. एके दिवशी बाबांनी त्याला

बोलता बोलता टोमणा मारला, "ऐंशी रुपये माझ्या हातात टाकून महिना दोन महिने माझं तोंड तू बंद करणार होतास नाही का रे चोरा! बघ कशी देवाने तुला शिक्षा दिली!" काशीरामच्या डोळ्यातून पाणी वाहू लागले. तो गहिवरून म्हणाला, "बाबा, तुमच्यासारख्या कुबेराला माझ्यासारख्या दरवेशाने काय बरं द्यावं!"

पुढे काही दिवसांनी काशीराम खडखडीत बरा झाला; हिंडू फिरू लागला व बाबांची पुन्हा सेवा करू लागला. एके दिवशी सकाळी मशिदीत बाबांची बैठक भरली असताना मुंग्यांची भाषा बाबांना समजते असे म्हाळसापतींचे मोठ्या आग्रहाने प्रतिपादन चालले होते. शामा त्यावर म्हणाला, बाबांना मुंग्यांचीच काय कुत्र्या-कावळ्याची, मांजरांची व डुकरांची इतकेच काय गाढवांची देखील भाषा समजते. त्या खेरीज का ते आपल्याला टाकून मधेच जंगलात भटकून येत असतात. बाबा हे आपले स्वस्थपणे सारे ऐकत होते.

हे असे बोलणे चालले असतानाच मामलेदार कचेरीतून एक पट्टेवाला दोन शिपायांना घेऊन तिथे आला, तो म्हणाला, "इथं काशीराम शिंपी आहे काय?" पट्टेवाल्याला पाहून काशीराम पराकाष्ठेचा घाबरला, तो रडत म्हणाला, "अहो मी भिल्ल दरोडेखोराना मारले नाही, मला पकडू नका. तो खुद्दच स्वतःच्या कुऱ्हाडीवर पडला."

पट्टेवाला हसून म्हणाला, "घाबरू नका शिंपीदादा, तुम्ही दरोडेखोरांशी शूरपणे सामना दिलात म्हणून सरकारकडून ही तलवार आणि ही पैशांची थैली इनाम म्हणून देण्यात आली आहे ती घ्या. त्या टोळीच्या नायकाच्या तपासासाठी सरकार जीवाचे रान करीत होते. शाबास आहे तुमची." ही घटना घडण्यापूर्वीच काशीरामचे बाबांनी ''वीर पुरुष'' म्हणून स्वागत केले होते, व ही घटना झाल्या नंतर मात्र बाबांनी काशीरामला वीर पुरुष का म्हटले याचा उलगडा सर्व भक्तांना झाला. बाबा गालातल्या गालात हसत म्हणाले, "काशा, 'मी अमुक केलं मी तमुक केलं' असा अहंकार माणसाने कधी बाळगू नये. कर्ता करविता एकच आणि तो म्हणजे 'अल्लामालिक.'"

"होय बाबा. मी चुकलो" असे म्हणून काशीरामने पैशांची थैली व तलवार साईबाबांच्या पायावर वाहिली.

आपल्या प्रिय भक्ताला संकटातून सोडविण्यासाठी बाबांनी मशिदमाईंत आकांत केला होता हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

श्रीसाईबाबांचा हा निस्सीम भक्त काशीराम शके १८३० च्या चैत्र शुद्ध एकादशीला निधन पावला. आपल्या उभ्या आयुष्यात त्याच्यावर ओढवलेल्या या महाभयंकर आपत्तीतून बाबांनी त्याची सुटका कशी काय केली हे वाचले म्हणजे बाबांच्या चरणी आपले मस्तक आणखीन विनम्र होते यात काय शंका ?

☆

**श्रीसाईनाथकालीन व्यक्तींनो, माहिती त्वरीत पाठवा**

श्रीसाईबाबांना प्रत्यक्ष पाहिलेल्या, त्यांचे दर्शन घेतलेल्या व्यक्तींनी आपली स्वतःची माहिती व त्यासोबत एक छोटेसे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र श्रीसाईलीलाच्या – श्रीसाईहयात कालीन व्यक्ती खास अंकासाठी त्वरेने पाठवावे. हा सर्वांगसुंदर परिपूर्ण असा अंक ऑगस्ट १९७९ मध्ये प्रकाशित होत आहे.

**पत्ता–** श्री. संपादक श्रीसाईलीला, ८०४ बी, साईनिकेतन डॉ. आंबेडकर रोड, दादर; मुंबई – ४०० ०१४.

# श्रीबाबा परकाया प्रवेशही करीत

दुसऱ्या प्राणीमात्राच्या शरीरात प्रवेश करणे हे काही साधेसुधे काम नाही योग्यालाच ते शक्य आहे. पण ते सुद्धा वाटेल तेव्हा नव्हे.

श्रीसाईबाबांना परकाया प्रवेश करता येत होता. यामुळेच की काय एकदा त्यांनी मांजराच्या रूपाने शिंक्यावर ठेवलेले दही खाल्ले व मारही खाल्ला.

मुंबईस दादरला लाला हंसराज नावाचे एक वाणी राहात असत. ते साईभक्त होते. या वाण्याच्या घरात शिंक्यावर ठेवलेले दही मांजराच्या रूपाने बाबा रोज खात असत. रोज शिंक्यावरचे दही खाणाऱ्या मांजरावर हंसराजने पाळत ठेवली व मांजर शिंक्याकडे जाताच काठीचा एक तडाखा लगावला. त्यामुळे त्या मांजराच्या पाठीवर वळ उठला.

दुपारी हंसराजाकडे पाहून बाबा म्हणाले, "या उरफाट्या काळजाच्या माणसाने मला काठीने मारले. हा बघा माझ्या पाठीवर वळ उठला आहे." हंसराजने हे सारे बघताच त्याला मोठे आश्चर्य वाटले व आपण मांजराला न मारता बाबांना मारले याबद्दल त्याला जन्मभर वाईट वाटत राहिले.

बाबांच्या परकायाप्रवेशाची आणखीन एक कथा आहे.

एकदा शिरडीला दुपारच्या भोजनाची पाने वाढलेली होती. इतक्यात एक भुकेलेला कुत्रा त्या ठिकाणी आला आणि आपली जीभ काढून काहीतरी खावयास मिळावे म्हणून शेपटी हालवीत आशाळभूतपणे सारखा पहात उभा राहिला. त्या कुत्र्यास तशा अवस्थेत पाहून तर्खडमाईंनी एक चतकोर भाकरी त्याला खावयास घातली.

दुपारी भोजन झाल्यावर द्वारकामाईत गप्पागोष्टी चालू असताना बाबा तर्खड-माईंना उद्देशून म्हणाले, "आई! आज तू मला पोटभर जेऊ घातलेस. भुकेने माझे प्राण अक्षरशः व्याकुळ झाले होते. ते तू तृप्त केलेस. अशीच दया मजवर करावी. प्रथम भुकेलेल्याला भाकरी द्यावी व मगच आपण खावी." तर्खडमाई म्हणाल्या, "बाबा! मी तुम्हाला आज केव्हाही भोजन दिले नाही, मग आपण हे कसे काय बोलता आहांत?"

तेव्हा बाबा म्हणाले, " आई ! तू दुपारी ज्या भुकेल्या कुत्र्याला भाकरी घातलीस तो मी स्वतः कुत्र्याच्या रूपाने आलो होतो. त्या कुत्र्याची आणि माझी एकात्मता आहे हे लक्षात ठेवा ! "

जगातील कोणत्याही प्राणीमात्राशी बाबा एकरूप झालेले असत. आपल्या भक्ताने कोणत्याही प्राण्याची मनापासून केलेली सेवा बाबांना पोचत असे.

एकदा काय झाले शिरडीला एक भक्त स्त्री ताटात बाबांसाठी भाकरी घेऊन आली व ती बाबांना अर्पण करण्यासाठी निघाली. वाटेत एक कुत्रे जिभल्या चाटीत चाटीत तिच्या पायाशी आले. तेव्हा बाईने ती भाकरी कुत्र्यापुढे टाकली. ती परत गेली व आपल्यासाठी ठेवलेली भाकरी घेऊन बाबांना देण्यासाठी म्हणून पुन्हा निघाली, तोच चिखलात लडबडलेले एक डुक्कर तिच्यापुढे आले. त्याच्यापुढे तिने ती पण भाकरी टाकली. मग त्या बाईच्या लक्षात आले की बाबांसाठी दोन्ही वेळेला आणलेल्या भाकऱ्या आपल्या मनातील प्रेरणेने आपण कुत्र्याला व डुकराला दिल्या व बाबांना आता द्यायला आपल्याकडे काहीच उरलेले नाही, म्हणून तिने मनात बाबांची क्षमा मागितली. काही वेळाने ती बाबांच्यापुढे जाऊन बसली. तेव्हा बाबा तिला म्हणाले, " आई, आज तू मला जेवण दिलेस त्यामुळे माझे पोट भरलेले आहे. व मी समाधानाने ढेकर दिली. " ह्या बिचाऱ्या बाईला बाबांच्या या बोलण्याचा अर्थच समजेना. तिला वाटले की आपण आज बाबांना जेवण न देता किंवा न आणता तुसतेच आलो म्हणून बाबा आपल्याला हिणवताहेत. म्हणून ती थोडीशी हिरमुसली होऊन म्हणाली, "बाबा, आज माझ्याजवळ काही उरलेच नाही, तर मी तरी तुम्हाला कोठून आणणार !" बाबा म्हणाले, "आई, आज तू कुत्र्याला व डुकराला ज्या भाकरी वाढल्यास ना, त्या मला पोचल्या. कारण सगळया प्राण्यांशी मी एकरूप झालेला असतो."

बाबांच्या अंतर्ज्ञानी मनोवृत्तीचे आता एकच उदाहरण, एक बाई बाबांची अगदी मनःपूर्वक भक्ती करीत असे, एकदा ती बाबांच्याकडे आली असता तिच्या डोक्यावरून हळूहळू हात फिरवीत बाबा म्हणाले, "आई, आपलं डोचकं लई दुखतं नाही ? "

बाई एकदम डोकं वरती करून म्हणाली; " बाबा, या घडीपर्यंत दुखत होतं पण आता मुळीच दुखत नाही."

बाबा म्हणाले, " आई, यापुढे कधी दुखायचं नाही बरं । "

खरोखरच त्या बाईंचे डोके यापूर्वी सतत सहा वर्षे दुखत होते; परंतु ते बाबांनी बरे करावे या हेतूने काही ती शिरडीस आली नव्हती. तरी बाबांनी ते ओळखून आपला वरदहस्त तिच्यावर ठेवला व तिचे डोके दुखणे अगदी कायमचे बंद केले.

ती बाई आपल्या घरी बाबांना रोज तीनदा नैवेद्य दाखवीत असे. बाबा तिला म्हणाले, "आई, मला तुझ्या घरी रोज तीनदा नैवेद्य खायला यावं लागतं." असे म्हणून तिच्या घराच्या व घरातील मंडळींच्या सर्व त्या खाणाखुणा बाबांनी नेमक्या सांगितल्या.

अशा आहेत या बाबांच्या लीला. त्या सांगाव्या तितक्या थोड्याच म्हणून आवरते घेतो.

## शुभ मंगल

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे शासकीय अधिक्षक श्री. द. चिं. पाठकसाहेब यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. मुकुंदराव बी. इ. (मेटॅलर्जी) यांचा शुभविवाह श्री. सांभ शेषराव धन, जालना यांची ज्येष्ठ कन्या शोभा बी. कॉम् इजबरोबर सी. टी. एस्. के. गुजराती विद्यालय जालना येथे ता. २२ मे ७९ रोजी मोठ्या थाटाने साजरा झाला. वधूवराना शुभाशिर्वाद देण्यासाठी कोर्ट रिसिव्हर श्री. काकरेसाहेब व विविध क्षेत्रातील नामवंत मंडळी हजर होती.

# पंचमहाभूतांवरही बाबांची सत्ता

● पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश यांना पंच महाभूते असे म्हणतात. यांच्यावर मानवाची सत्ता चालूच शकत नाही. पण श्रीसाईनाथांची या पंचमहाभूतावरही सत्ता चाले. त्यांचेवर पण ते अधिकार गाजवीत कसे ते पहा:—

श्रीसाईबाबा शिर्डीत असताना एकदा प्रचंड वादळ होऊन जोराचा वारापाऊस सुरू झाला. अगोदरच अहमदनगर जिल्हा हा अवर्षणाचा समजला जातो. पाऊस तिथे कमीच पडतो. पण का कुणास ठाऊक एकदा जोराचा पाऊस पडला. पावसाबरोबर विजांचा गडगडाट व जोरदार वादळ झाल्यामुळे शिर्डी गावातील लोक, अगदी हवालदील झाले. आपला प्रलयकाल जवळ आला असे त्यांना वाटू लागले. मेघांचा भयंकर गडगडाट, विजांचे थैमान व त्यातच गारा पडून गुरे-माणसे हैराण झाली, कित्येक घरांवरची कौले फुटली. सगळीकडे पाणीच पाणी झाले. निसर्गाच्या या कोपाला आता आळा घाला, म्हणून बाबांना विनंती करण्याकरिता शिरडीतील खूप लोक द्वारकामाईसभोवती गोळा झाले. झाल्या प्रकाराने बाबांना दया आली. बाबांजवळ नेहमी एक हातभर लांबीचा दांडका असे. त्याला ते 'सटका' म्हणत. हा सटका हातात घेऊन ते मशिदीच्या दरवाजावर आले व आकाशाकडे पाहात व तोंडाने काही मंत्र पुटपुटत हातातील सटका मोठमोठ्याने खांबावर मारू लागले. ते दोनचारदा एवढे जोरात खेकसले की लोकांना पावसापेक्षा त्यांच्या त्या ओरडण्याची भीति वाटली. परिणामी चमत्कार असा झाला की पाऊस व वादळ कमी कमी होत जाऊन ते एकदम बंद झाले.

अशाच एक प्रकार प्रत्यक्ष मशिदीत घडला. साईबाबा अग्निपूजक होते हे सर्वांना माहित आहेच. त्यांनी सतत धुनी पेटती ठेवली होती. एकदा त्यांनी जी धुनी पेटत ठेवली आहे ती अखंडपणे आज सत्तर वर्षे तशीच पेटती आहे. ती कधीच विझलेली नाही. अशा या बाबांच्या धुनीने एकदा मोठा पेट घेतला. तिच्या ज्वाळा भडकत भडकत मशिदीच्या थेट तक्तपोशीपर्यंत जाऊन भिडल्या. बाबा मात्र हालचाल न करता स्वस्थ चित्ताने तिथे बसून होते. त्यांच्या चेहेऱ्यावर भीतीचे लक्षण नव्हते की आग विझविण्याची धडपड त्यांनी केली नाही. आता सबंध मशिद जळून खाक होईल या भितीने लोक गांगरून गेले. पण पाणी आणून आग विझविण्याची कुणाची छातीच होईना. कारण बाबांना ते रुचले नाही तर त्यांचा

सटका डोक्यात बसेल ही भीती आगीपेक्षाही अधिक मोठी होती. बाबांचा कोप म्हणजे जबरदस्त दहशत लोकांना वाटत होती. तेवढ्यात ज्वाला अधिकच भडकत चालल्या म्हणून मग बाबांनी स्वतःच हालचाल केली, त्यांनी आपला सटका हाती घेतला व तो खांबावर आपटीत अग्नीला, "सबूर, सबूर, हट की माघारा" असा हुकूम करण्यास आरंभ केला. त्यांच्या त्या सटक्याच्या प्रत्येक फटकाऱ्यागणिक ज्वाला खाली खाली येत तो भडकलेला अग्नि शांत झाला! केवढे हे महान सामर्थ्य! पावसाचा व दुसरा अग्नीचा असे हे दोन्ही पुरावे बाबांची पंचमहाभूतांवर सत्ता चालत असे हे सिद्ध करणारे आहेत.

एकदा तर बाबांनी याबाबतीत कमालच केली. ताजुद्दीन बाबा नावाचे एक संत नागपूरच्या बाजूला होऊन गेले. साईबाबांचे ते समकालीन. त्यांच्या दरग्याला एकदा आग लागली. तोच शिरडीत साईबाबा आपल्या धुनीतील आग विझवल्यासारखे करू लागले. लोकांनी विचारले, "बाबा हे काय करता?" "माझ्या ताजुद्दीनच्या दरग्याची आग विझवतो आहे." बाबा म्हणाले.

आणि काय आश्चर्य! खरोखरीच तिकडे आग लागलेली होती. दोन दिवसांनी पत्र आले, त्यात स्वतः ताजुद्दीन बाबांनीच ही हकीकत त्या पत्रात लिहिली होती. आग नागपूरला व तिची खबर बाबांना शिरडीला कशी काय कळली मोठे नवलच आहे. व ती आग त्यांनी शिरडीहून विझविली हे त्याहूनही आश्चर्य होय.

यंदाचे वर्षी गुरुपौर्णिमा (आषाढ शु. १५) दि. ९-७-७९ सोमवार रोजी आहे. उत्सव दि. ८-७-७९ ते १०-७-७९ (रविवार, सोमवार, मंगळवार) असे तीन दिवस असून मुख्य दिवस दि. ९-७-७९ (सोमवार) आहे.

# अंतर्ज्ञानी साईनाथ

दुसऱ्याच्या मनातला हेतू स्वतः ओळखणे याला अंतर्ज्ञान म्हणतात. बाबा अंतर्ज्ञानी होते व दुसऱ्याच्या अंतःकरणात शिरून ते त्याचे विचार बरोबर ओळखत.

साईबाबांच्या अंतर्ज्ञानाची अनेक उदाहरणे आहेत. त्यातली काही निवडक उदाहरणे द्यावीशी वाटतात.

कल्याणच्या नानासाहेब चांदोरकरांची पंढरपूरला मामलेदारीच्या जागी कायम नेमणूक करण्यात आली होती. पंढरपूरला आपल्या जागेचा तात्रा घेण्यापूर्वी साईबाबांच्या दर्शनासाठी ते शिर्डीस आले. साधारणपणे ते शिर्डी गावाच्या सीमेवर पोचतात न पोचतात तो बाबांनी म्हाळसापती, भागोजी शिंदे इत्यादी शिर्डीच्या आपल्या भक्त मंडळींना आज आपण भजन करूया असं सांगितले. चांदोरकरजी येताच आपण मोठ्या रंगात आल्याचा अविर्भाव करून मोठमोठ्याने ते भजन म्हणू लागले, ते भजन असे होते—

पंढरपूरला जायाचे जायाचे । तिथेच मजला राह्याचे राह्याचे ।<br>
तिथेच मजला राह्याचे राह्याचे । घर ते माझ्या रायाचे, रायाचे ॥

नानासाहेब चांदोरकर मशिदीच्या दारात पोचताच हे भजन ऐकून अक्षरशः थक्कच झाले. आपल्या पंढरपूरच्या नेमणुकीची ही वार्ता बाबांना अगोदर कशी काय कळली याचे त्यांना राहून राहून आश्चर्य वाटत होते.

बाबांना जसे अंतर्ज्ञान होते तसे त्यांना प्राणिमात्रांच्या पूर्वजन्माचेही पूर्णपणे ज्ञान होते.

## पालीची सख्खी बहिण

एकदा एक भक्त बाबांच्या समोर मशिदमाईत बसलेला असतांना भिंतीवर एक पाल चुकचुकली. भक्ताने विचारले, "बाबा, या पालीच्या चुकचुकण्याचा अर्थ काय ? काही अशुभ घडणार आहे की काय ?"

बाबा त्यावर म्हणाले, "अरे यात अशुभ असं काही नाही. त्या पालीची बहिण आज औरंगाबादेहून इथे तिला भेटायला येणार आहे. म्हणून ती मोठ्या आनंदाने चुकचुक असा अवाज करते आहे.

बाबा हे काही तरी विनोदाने बोलत आहेत असेच तिथल्या मंडळींना वाटले. एवढ्यात आणखीन एक भक्त औरंगाबादेहून बाबांच्या दर्शनासाठी आला. त्याने आपल्या बाहेर बांधून ठेवलेल्या घोड्याला चारा घातला व बाबांसमोर ठेवण्यासाठी म्हणून नारळ इत्यादी काढण्यासाठी आपले गोणते जो सोडले तोच त्यातून एक पाल बाहेर पडली व झरझर भिंतीवर चढून त्या पहिल्या पालीला भेटली. कितीतरी वेळ त्या दोघी एकमेकींच्या तोंडात तोंड घालून चुकचुकत होत्या व फेर धरून नाचत होत्या. सर्व लोक हा प्रकार पहात होते. त्यावरून त्या बहिणी बहिणीच असल्या पाहिजेत अशी तिथल्या सगळ्यांची खात्री झाली. पण बाबांना हे सर्व आधीच कसे काय कळले होते याबद्दल सर्वांना अत्यंत आश्चर्य वाटले. ही गोष्ट बाबांनी आगाऊ कथन करावी, ही पाल त्या पालीची सख्खी बहिण असल्याचे सांगावे व ते सत्य ठरावे यात केवढे मोठे आश्चर्य आहे! (अध्याय १५ ओवी ८२)

बाबांच्या अंतर्ज्ञानाचे आणखीन एक उदाहरण द्यावेसे वाटते. बाबा लेंडीबागेहून मशिदीत येऊ लागले म्हणजे एखादे दिवशी शेळ्यांचा कळप दिसला रे दिसला की ते आनंदून जात. कित्येकदा त्या शेळ्यातून काही शेळया ते खरेदी करीत. असेच एकदा फिरून परत येत असताना त्यांनी दोन शेळ्या बत्तीस रुपयांना खरेदी केल्या. ज्या शेळीची किंमत त्यावेळी दोन रुपये होती तिला त्यांनी सोळा रुपये दिल्याबद्दल माधवराव देशपांडे इ. लोकांना खूप वाईट वाटले. बाबांना व्यवहार कळत नाही. ते वाटेल त्या वस्तूला वाटेल ती किंमत देतात असा त्यांनी बाबांना दोष दिला. बाबा या शेळयांना सारखे कुरवाळीतच होते. बाबा काही बोलत नाहीत आणि नुसते शेळ्यांना सारखे आपले कुरवाळीतच स्वस्थ राहिले आहेत, यामुळे माधवरावांना अधिक चेव चढला व ते बाबांना अधिकच दोष देऊ लागले. या लोकांचा गैरसमज झालेला आहे हे पाहून बाबा म्हणाले, "अरे मला न घर न दार, बसायला सुद्धा जिथे मला जागा नाही तिथे मी हा शेळया-मेंढ्यांचा संग्रह करतो आहे असे का तुम्हाला वाटते?" अगोदर वाण्याकडून डाळ आणून या शेळयांना चारा. त्यांना ती भरपूर खाऊ देत, मग त्या धनगराला देऊन टाका." म्हणजे हा न्याय पहा! बाबांनी निष्कारण पैसे घालविले म्हणून लोक त्यांना दोष देत होते तर बाबांनी डाळीसाठी आणखीन खर्च केला. इतके करून त्या शेळया पुन्हा धनगरालाच द्यावयाच्या याचा अर्थ तरी काय असे वाटून माधवरावांनी बाबांना छेडण्यास प्रारंभ केला. त्यावर बाबा म्हणाले, या शेळयांना पाहून माझे अंतःकरण प्रेमाने भरून आले आहे. या शेळया पूर्वजन्मी मानव होत्या आणि त्या बंधु होत्या. द्रव्यलोभामुळे त्यांच्यात मत्सर निर्माण झाला. एक दिलाने वागणारे हे बंधू एक-

मेकांचे वैरी बनले. त्यांच्या वैरामुळे त्यांचा अधःपात होत आहे, शेवटी एक दुसऱ्याचा खून करण्यास निघाला असता एकमेकांच्या वाराने दोघांचाही खून झाला. त्या कृतकर्मांचा भोग भोगण्यासाठी ते या शेळयांच्या जन्माला आले. त्यांना पाहून मला दया उपजली, म्हणूनच तर पदरचे पैसे खर्च करून त्यांच्या चित्ताला विसावा द्यावा असे मला वाटले. पुन्हा त्यांचे कर्म तुमच्या निमित्ताने त्यांच्या सुखाच्या आड आले आणि तुमच्या आग्रहाने पुन्हा त्या धनगराकडे जात आहेत.

या कथेपेक्षाही आणखीन एक कथा साईबाबांनी आपल्या मुखाने सांगितलेली आहे. ती त्यांच्या अंतर्ज्ञानाची जशी साक्ष देते तशी ती माणसाच्या द्वेषमूलक भावनेने त्याला कशी अधोगती मिळते त्याची द्योतक आहे. बाबा या कथेसंबंधाने म्हणाले, "मी एकदा सकाळी दूरवर फिरावयास गेलो. बराच वेळ चालल्यावर थकून गेलो. चिलीम ओढावी म्हणून चिलीम भरून छापी भिजविण्यास जातो तर 'डराव डराव' असे बेडकाचे शब्द ऐकले. मी छापी भिजवून चिलीम ओढणार एवढ्यात एक वाटसरू आला. माझी त्याने विचारपूस केली, तेवढ्यात पुन्हा बेडकाचा आर्तस्वर ऐकू आला. त्या वाटसरूला काय आहे हे प्रत्यक्ष पाहाण्याची इच्छा झाली. तो ते दृश्य पाहून आल्यावर म्हणाला, 'एका सर्पाने आपल्या तोंडात बेडूक धरला आहे आणि आता लौकरच तो त्या बेडकाला गिळंकृत करील'. त्यावर मी म्हणालो, "अरे मी येथे येऊन बसलो आहे ते कशासाठी ? त्या सर्पाला त्या बेडकाचा फडशा पाडू देईनच कसा मी ! मी आता ही झुंज सोडवतो पहा" असे म्हणून त्या वाटसरूला बरोबर घेऊन मी साप व बेडूक जिथे होते त्या ठिकाणी गेलो. तो भयंकर सर्प पाहून तो वाटसरू बावरला. मी त्या चवताळलेल्या सर्पाला म्हणालो, "अरे वीरभद्रप्पा, तुझ्या या बसप्पाला बेडकाचा जन्म मिळाला तरीही अद्याप त्याला पश्चाताप झाला नाहीच का ! तूही सर्पाच्या योनीला आलास, तर आता तरी शरम धरून स्वस्थ रहा।" माझे हे शब्द कानी पडताच सर्प त्या बेडकाला सोडून पळाला आणि बेडूकही कुठच्या कुठे पळून गेला. त्या वाटसरूला हा प्रसंग पाहून मोठे आश्चर्य वाटले. त्याने हा काय प्रकार आहे, याची मजकडे चौकशी केली. तेव्हा मी ती सबंध हकीगत त्याला सांगितली, ती अशी– एक महादेवाचे देऊळ मोडकळीस आलेले होते. त्याचा जीर्णोद्धार करावा असे लोकांच्या मनात येऊन रक्कम गोळा केली गेली व तेथील एका धनिकाला व्यवस्थापक नेमले. रक्कम त्याजकडे दिली आणि कमी पडेल ती रक्कम खर्चून देवळाचे कामकाज पूर्ण करण्याची त्यास विनंती केली गेली. पण धनिक महाकंजूष होता. त्याने थोडेफार काम करून घेतले. पण आपली रक्कम तो काही केल्या खर्च करीचना. गावकऱ्यांनी पुन्हा काही रकमा गोळा

करून दिल्या. तरी ते काम पूर्ण होईना. कारण कमी पडणारी आपली स्वतःची वर्गणी हा धनिक देतच नव्हता. पुढे त्याच्या पत्नीला दृष्टांत होऊन त्यात देवळाचे कामकाज पूर्ण करा. जेवढे तुम्ही खर्च कराल त्याच्या शतपट तुम्हाला मिळतील असे सांगितले गेले. पत्नीने हा वृत्तांत पतीला कथन केला पण तरीही त्या कंजूष पतीने पत्नीच्या स्वप्नावर विश्वास ठेवला नाही. धनिक काही आपल्या पिशवीतील एक पैसा म्हणून काढीना. तेव्हा फिरून त्या बिचाऱ्या पत्नीला दृष्टांत झाला की तुझा पती कृपण आहे तो काहीही देणार नाही. आणि भाव नसताना दिलेल्याचा काही उपयोग होणार नाही. तेव्हा तुझ्याकडे जे काय असेल ते तू दे, निष्ठा ठेवून काहीही दिलेस तरी त्याचा उपयोग होईल. मात्र पतीची आज्ञा घेऊन मगच काय ते दे. या स्वप्न-आदेशाप्रमाणे आपल्या वडिलांच्याकडून आलेले अलंकार देण्याचा तिने निश्चय केला आणि तो निश्चय पतीला सांगितला. पण तिचा पति मोठा लोभी होता. त्याने तिच्या दागदागिन्यांचे मोल करून त्याच्या मोबदल्यात त्याच्याकडे दुसऱ्याची गहाण असलेली नापिक जमीन तिला दिली; व ती त्या देवाला अर्पण करण्यास सांगितले. त्याप्रमाणे पत्नीने ती नापिक जमीन देवाला अर्पण केली. ती जमीन डुबकी नावाच्या एका गरीब बाईची होती. याच सुमारास पाऊस व वादळ सुरू झाले. वीजांचा भयंकर चमचमाट होऊ लागला. त्या गावात वीजेचा लोळ शिरला व त्यासरशी सर्व काही जळून खाक झाले. धनिक पत्नी आणि डुबकीसुद्धा त्यात निधन पावली.

पुढे हा कंजुष धनिक मथुरा नगरीत एका गरीब ब्राह्मणाच्या पोटी जन्मास आला. त्याचे नाव वीरभद्र ठेवण्यात आले. धनिकाची बायको पुजाऱ्याच्या घरी जन्मास आली. तिचे नाव गौरी असे ठेवले गेले. आणि डुबकी शंकराच्या देवळाच्या गुरवाच्या घरी पुत्र जन्म पावली, त्याचे नाव चनबसप्पा ठेवण्यात आले. हा शंकराचा पुजारी माझ्या आवडीचा होता. तो दररोज मजकडे येऊन गोष्टी बोलत बसे. गौरीही मोठी होऊ लागली. ती पण माझी भक्ती करू लागली. ती जसजसी मोठी होऊ लागली तेव्हा वर संशोधन सुरू झाले. तू पैसेवाली होशील, तू काळजी करू नकोस असे मी तिला सांगितले. इकडे तो वीरभद्र आपल्या आईबापांचा गरीबीचा संसार सोडून निघाला तो भिक्षाटन करीत करीत या पुजाऱ्याच्या घरी आला. तिथेच तो राहिला. त्याच्यावर सर्वांचा लोभ जडला. गौरीचे त्याजबरोबर लग्न झाले. वीरभद्र पण माझ्या भक्तीला लागला. पण त्याचा संसार मात्र गरीबीचाच राहिला. पुढे एके दिवशी एक सावकार आला आणि शंकरास दिलेल्या या खाजगी जमिनीची एक लाख रुपये किंमत त्याने देऊ केली. त्यावेळी चनबसप्पा गुरव हिश्श्यासाठी उठला. हिश्श्यासाठी दोघांची वादावादी जुंपली. दोघेही मजकडे आले. मी म्हणालो,

"जमीन शंकराची आहे. ही जमीन गौरीने उपभोगावी. कारण देवाची जमीन पुजाऱ्याने उपभोगावयाची व गौरी पुजाऱ्याची वारस आहे. तेव्हां तिचाच तीवर हक्क आहे," मी असे म्हटल्यावर वीरभद्र माझ्यावर रागावला. त्याच्या पत्नीची जमिनीवर मालकी प्रस्थापित करणे त्याला आवडले नाही. त्याच दिवशी रात्री गौरीला स्वप्न पडले. शंकराने गौरीला, ही जमीन तुझी आहे, कुणालाही काही देऊ नको. चनबसाप्पा सांगेल तसतसा देवळाला पैसा लाव व स्वस्थ रहा असे स्वप्नात सांगितले. पैशापैकी मुद्दल तू घे व व्याजाचे पैसे चनबसाप्पाला दे. या पैशात वीरभद्राचा काही संबंध नाही असेही शंकराने सांगितले. वीरभद्र अत्यंत चिडला. त्याने शिव्यांची लाखोली वाहिली. त्याला उन्मत्त वाद झाला, चनबसप्पाला तुझे तुकडे तुकडे करीन असे सांगू लागला. पुढे या वादामुळे वीरभद्र मरण पावला आणि पुढे तो सर्पयोनीत जन्मास आला. इकडे चनबसप्पालाही वीरभद्राच्या दहशतीमुळे मृत्यु आला. तो बेडकाच्या योनीत जन्मास आला. आणि अद्यापही या योनीतसुद्धा हे वैर खेळताहेत. तू घाबरू नकोस असे मी चनबसप्पाला पूर्वी आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे आज मी त्याला वीरभद्ररूपी सर्पाच्या तोंडून सोडविला. देव भक्तांच्या संकटाला धावून येतो. त्याने मला आज चनबसाप्पाला संरक्षणार्थ पाठविले. एवढे झाल्यावर मी परत मशिदीत आलो. (अध्याय ४७ वा)

या घटनेवरून बाबांना पूर्व जन्मीचे अंतर्ज्ञान होते हे दिसून येते. त्याचप्रमाणे या घटनेवरून माणसाने लोभी असू नये. संपत्तीचा मोह धरू नये आणि दुसऱ्याच्या विषयी द्वेषभावना कधी ठेवू नये हे सांगितले आहे.

## वाघाची घटना

● एकदा एक दरवेशी एका चवताळलेल्या वाघाला घेऊन बाबांच्या दर्शनाकरिता आला. त्या वाघाला साखळदंडाने बांधलेले होते. पण तशाही स्थितीत तो भीषण डरकाळ्या फोडत होता. बाबा तेव्हा द्वारकामाईत बसलेले होते. बाबांनी त्या वाघाचे साखळदंड सोडण्यास सांगितले. ते सोडल्याबरोबर वाघ अगदी निमुटपणे बाबांच्यासमोर आला. आणि द्वारकामाईची पहिली पायरी जिथे आहे तिथे लगेच मरण पावला. मिनिटभरातला हा प्रसंग अनेकांनी पाहिला. बाबांनी त्याच्या पूर्वजन्माची हकीगत लगेच कथन केली. ते म्हणाले, कुणीही आपल्याजवळ येतो ते लाग्याबांध्यानेच. हा वाघ त्या दरवेशाचा पूर्वजन्मीचा देणेकरी होता. दरवेशाचे पदरी राहून त्याने ते देणे फेडले, पण हा पुण्यात्मा आहे. आज येथे येऊन तो मुक्त झाला आहे. बाबांनी लगेच त्या वाघाला आजच्या भक्त निवास इमारतीच्या जवळ जे शंकराचे छोटेसे देऊळ आहे, तिथे समोरच जो नंदी आहे त्या जवळ पुरण्यास

सांगितले. आज त्या वाघाची तेथे चांगली समाधी बांधण्यात आली आहे. वाघाच्या पूर्वपुण्याईमुळेच त्यास अंतकाळी संतदर्शन झाले.

आपल्या जवळचा वाघ बाबांच्या दर्शनासाठी आणला काय व तो तिथेच मरण पावला काय हे दृश्य पाहून दरवेशाला वाईट वाटले. जमलेल्या लोकांनी पैसे जमवून सुमारे ४० रु. त्याच्या हातावर ठेवले.

● श्रीवासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंबे स्वामी या नावाचे एक परमदत्तभक्त, साक्षात् दत्तावतारीच असे एक सत्पुरुष बाबांच्याच वेळेस या भारतात होऊन गेले. ते अतिशय कर्मठ, सोवळे ब्राम्हण व अग्निपूजक होते. वेदविद्या व मंत्रविद्या या दोन्हीवर त्यांचा पूर्ण अधिकार होता. आपल्या भक्तांना दर्शन देण्यासाठी जरी ते येऊन बसले तरी अभिमंत्रीत पाण्याचे मंडल स्वतःभोवती करून ते बसत. त्या मंडलाच्या आत येण्याची सर्वांना सक्त मनाई असे. त्यांनी तरुण वयातच संन्यास घेतला होता. बाबा व वासुदेवानंदजी एकमेकाना बंधु म्हणत असत.

श्रीवासुदेवानंदजी गोदावरीच्या तीरावरील राजमहेंद्री या ठिकाणी असताना नांदेडचे पुंडलिकराव वकील व आणखीन दोन मित्र त्यांच्या दर्शनास गेले. बोलता बोलता शिरडीच्या साईबाबांच्या तिथे गोष्टी निघाल्या. बाबांचे नाव कानी पडताच वासुदेवानंद गहिवरले. त्यांनी बसल्या जागीच बाबांचे स्मरण करून हात जोडले. कारण बाबा हे परब्रम्ह किंवा साक्षात् नारायणच आहेत अशी वासुदेवानंदांची श्रद्धा होती. पुंडलिकराव साईभक्त होते हे स्वामींना माहित होते, म्हणून स्वामींनी विचाले, "तुम्ही शिरडीला केव्हा जाणार आहात?"

"इथून आम्ही सर्व तिकडेच जाणार आहोत," पुंडलिकराव म्हणाले.

स्वामींनी जवळचेच एक श्रीफळ उचलले व ते हृदयाशी धरून पुंडलकरावांना देत स्वामी म्हणाले, "तर मग हे आमच्या बंधूना द्या व नमस्कार सांगा."

पुढे पुंडलिकराव मित्रांसह शिर्डीस जाण्यास निघाले. बाबांना अर्पण करण्यासाठी त्यांनी फळफळावळ तसेच आपल्या स्वतःसाठी फराळासाठी म्हणून काही वस्तू खाद्यपदार्थ खरेदी केले. कोपरगावाजवळ येऊन पोचल्यावर सर्वजण फराळ करण्यासाठी म्हणून रेल्वे फलाटाच्या बाहेर एका ओढ्याच्या काठी बसले. एका मित्राने तुपात तयार केलेला मुरमुऱ्यांचा चिवडा आणला होता. तो खूपच तिखट व झणझणीत होता. त्यामुळे सर्वजणांची तोंडे पोळली. एकाने सुचविले की, आपल्याबरोबर एक नारळ आहे तो फोडून चिवड्याबरोबर खाऊ म्हणजे तोंडाची आग शांत होईल. ही कल्पना सर्वांना पसंत पडली आणि एक नारळ फोडून तो सर्वांनी खाल्ला. तो नारळ म्हणजे नेमका श्रीवासुदेवानंदजींनी श्रीबाबांनाच दिलेला होता. ही गोष्ट लक्षात

येताच सर्वांना फार हळहळ वाटली. आता बाबांना काय सांगावे? प्रश्नच पडला. पुढे दुपारी ही सारी मंडळी शिरडीस पोचली व साईबाबांच्या दर्शनास गेली. पुंडलिकाला पाहाताच बाबांनी पहिलाच प्रश्न केला, "अहो महाराज, आमच्या बंधूरायांनी दिलेला नारळ कोठे आहे?" हे ऐकून पुंडलिक एकदम गोंधळून गेला व बाबांच्या पायावर साष्टांग नमस्कार घालून त्याने प्रांजळपणे घडलेला खरा प्रकार सांगितला व "दुसरा नारळ जाऊन घेऊन येतो" असे म्हणून जाण्यास उठला, तेव्हा त्यास बसावयास सांगून बाबा म्हणाले, "पुंडलिकराव, दुसरा नारळ देऊन कसे बरे भागेल? त्या नारळाची सर दुसऱ्या हजारो नारळांनाही येणार नाही. माझ्या बंधूंनी तुमच्याजवळ नारळ दिला त्याचवेळी मनाच्या संदेशाने मला कळविले होते. पुंडलिकराव तो नारळ नव्हता, ते माझ्या बंधूंचे हृदय होते. त्यांनी तुमच्याजवळ नारळ कसा दिला ते आठवा म्हणजे हे तुमच्या लक्षात येईल."

पुंडलिकरावांनी आठवून पाहिले, तो त्यांच्या लक्षात आले की, खरोखरच बाबांसाठी नारळ देताना स्वामींनी तो हृदयाशी धरला होता, व म्हटले होते की "हे आमच्या बंधूना नेऊन द्या."

मग बाबा त्या सर्वांना उद्देशून म्हणाले, "अरे तुम्ही नारळ खाल्लात म्हणून का मी रागावणार आहे. तुम्ही सारी माझी लेकरे. मज लेकरांनी नारळ खाल्ला म्हणून का बाप रागावेल? पण विश्वासाने दिलेली वस्तू तुम्ही जपून आणलीत नाही म्हणूनच मी तुम्हाला समज दिली." पुंडलिकरावांना बाबांच्या या अंतर्ज्ञानाची चांगलीच कल्पना आली.

## दिव्यचक्षु

साईबाबा आपल्या भक्तांची दुखणीसुद्धा आपल्या अंगावर घेत व ती स्वतः सोसून भक्तांना त्यातून सोडवीत. ही त्यांची मोठी अजब लीला. यासंबंधात अनेक उदाहरणे आहेत. एक विशेष सांगण्यासारखे उदाहरण असे. अमरावतीचे मालगुजार श्री. दादासाहेब खापर्डे यांची पत्नी आपल्या मुलाला घेऊन शिरडीला आली होती. तिथे त्या मुलाला प्लेगचा आजार झाला व तो मुलगा अतिशय अस्वस्थ झाला. आईने सर्व भार बाबांवर सोपविला व बाबांच्या पाया पडून ती आपले दुःख निवेदन करू लागली, "बाबा आता मी काय करू? मुलाला घेऊन घरी जाऊ का?" बाबा म्हणाले, "आई, मुलाची काळजी तू कशाला करतेस? त्याला आता काय होणार आहे? त्याचा ताप आणि गाठी मी घेतल्या आहेत. जा बघ तिकडे त्याचा ताप उतरू लागला की नाही ते" असे म्हणून आपल्या प्रत्येक खाकेत दोन मोठ्या अंड्याएवढ्या गाठी आलेल्या बाबांनी तिला दाखविल्या. त्यानंतर मुलगा खरोखरच बरा झाला. व प्लेगच्या सगळया वेदना बाबांनी अगदी सहजपणे भोगून टाकल्या.

बाबांचे नेत्र हे जणू दिव्यचक्षु आहेत असाच अनुभव खापर्डे साहेबांच्या पत्नीला त्या दिवशी आला व तो न चुकता वेळोवेळी बाबांच्या दर्शनाला नित्य येत असे. उभयता खापर्डे पती-पत्नी बाबांचे परम भक्त होती. आजही खापर्डे घराण्यात साईभक्ती आहे.

## त्रिकालज्ञानी साईबाबा

मराठवाड्यात नांदेड येथे धनाशेट श्री रतनजी हे पार्शी गृहस्थ राहात असत. श्रीबाबांच्या दर्शनास शिर्डीस येण्याचे त्यांनी ठरविले व तिथे जाण्यापूर्वी त्यांनी नांदेड येथे गुप्तरूपाने वास करीत असलेले संत श्रीमौलवी साहेब हमाल यांना एक छोटासा खाना दिला. त्यावेळी त्यांनी अवघी तीन रुपये चौदा आणे एवढी रक्कम खर्च केली. पण ही गोष्ट रतनजी शेटजींच्या लक्षातही नव्हती. रतनजी शेटजी जेव्हा शिरडीस आले व बाबांच्या दर्शनास गेले, आणि मग बाबांना दक्षिणा देऊ लागले, तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, "अरे, तू जी मला दक्षिणा देशील त्यामधून फक्त तीन रुपये चौदा आणे एवढी दक्षिणा वजा करून बाकी शिल्लक राहिलेले पैसे दे. तुझे तीन रुपये चौदा आणे मला यापूर्वीच पोचलेले आहेत." या घटनेवरून नांदेडमधले मौलवी साहेब व मी एकच. त्यांना दिलेला खाना तो मला पोचला, असे बाबांनी सुचविले. शेटजींना हे सारे आठवून बाबांच्या अंतर्ज्ञानाचा अनुभव आला व ते थक्कच झाले.

मुंबईत श्री. हरिश्चंद्र पितळे नावाचे एक साईभक्त होते. ते एकदा बाबांच्या दर्शनास गेले होते तेव्हा बाबांनी त्यांना तीन रुपये दिले व सांगितले की, "बापू, तुला मी पूर्वी दोन रुपये दिले आहेत त्यातच हे तीन रुपये आता ठेव व यांची पूजा करीत जा. पितळे हे प्रथमच बाबांच्या दर्शनास आले होते. तेव्हा त्यांना बाबांनी पूर्वी दोन रुपये दिले आहेत, या वाक्याचा किंवा बाबांच्या म्हणण्याचा अर्थच नीट समजेना. पुढे ते घरी आल्यावर त्यांनी आपल्या वयोवृद्ध मातोश्रींना शिरडीत बाबांच्याकडे घडलेली सारी हकीगत सांगितली. तेव्हा त्यांच्या आईंना स्मरण झाले आणि त्या लागलीच म्हणाल्या, "अरे बापू, बाबा जे काही बोलले ती हकीगत अगदी खरी आहे. एकदा तुझे वडील अक्कलकोट स्वामी महाराजांच्या दर्शनास गेले असताना तिथे स्वामींनी त्यांना दोन रुपये देऊन त्याची पूजा करीत जा असे सांगितले त्याप्रमाणे त्यांची पूजा होत असे. पुढे देवाची पूजाच कुणी करीनासे झाले व ते दोन रुपये लहान पोरांनी कुठे खेळण्यात घालवून टाकले. यावरून अक्कलकोट स्वामी तो मीच हे बाबांनी सुचविले आहे.

बाबांनी समाधि घेण्याच्या आदल्या वर्षी म्हणजे १९१७ साली होळीपौर्णिमेच्या पहाटेला अण्णासाहेब दाभोळकरांच्या स्वप्नात जाऊन सांगितले की, "आज दुपारी मी तुझ्याकडे जेवायला येणार आहे." अण्णांना व त्यांच्या कुटुंबियाना या स्वप्नाबद्दल आनंद वाटला. त्या दिवशी त्यांच्याकडे जेवायला खूप मंडळी होती. ठीक

बारा वाजता सगळ्यांची पाने वाढली. त्यात बाबांसाठीही एक पान वाढले गेले. परंतु बारा वाजून गेले तरी बाबा आले नाहीत. अण्णासाहेब समजून होते की बाबा प्रत्यक्ष जातीने येतीलच असे नव्हे तर ते कुणाच्या तरी रूपाने खात्रीने येतील. परंतु उशीर होत आल्याने बाबांचे पान तसेच बाजूला करून ठेवून त्यांनी इतरांना सुरवात करण्याची विनंती केली. वैश्वदेव नैवेद्य होऊन मंडळी सुरुवात करणार इतक्यात—

हेमाडगृहि होलिकोत्सव दिनी रांगोळीया काढल्या।
भाजी–भात–वरान्न आणिक खिरी कोशिंबिरी वाढल्या।
ऐशा या समयी अतिथि–द्वय ते दारी पहा पातले।
"ही वस्तू तुमची असे, तरि तुम्ही राखा" असे ते बोलले।

हे दोन मुसलमान म्हणजे एक अलीमहमूद व दुसरा इस्मू मुजावर. अलीने क्षमा मागून म्हटले, "हीं आपली वस्तू ठेवा." असे म्हणून वृत्तपत्रात वेष्टन केलेली एक वस्तू त्याने टेबलावर ठेवली. हे दोघे अगदी अपरिचित होते. म्हणून अण्णासाहेबांनी त्यांना तुम्ही कोण? कुठले? माझा पत्ता तुम्हाला कुठून कळला? ही वस्तू माझी कशी व ती तुम्हीं याचवेळी इथे आणण्याचे प्रयोजन काय? इ. प्रश्न विचारले. त्यावर अली म्हणाला, "ती हकीकत मोठी आहे. मी पुढे मागे तुमच्याकडे येईन व तुम्हाला ती सावकाशपणे सांगेन," असे म्हणून तो निघून गेला व त्या गडबडीत त्या दोघांचा पत्ता घेण्याचेही अण्णांना भान राहिले नाही. नंतर अण्णांनी वेष्टन उघडून पाहिले तर आत काय? मोठे नवलच!! बाबांची पूर्वी कधीही न पाहिलेली अत्यंत सुंदर अशी तसबीर होती!! साईबाबांची ही अजब लीला पाहून सर्वांच्याच अंगावर आनंदाने रोमांच उभे राहिले. बाबांची तसबीर अगदी बरोबर जेवणाचे वेळी आलेली होती. सर्वांनी ती तसबीर पाहिली. सर्वांनी तिला वंदन केले. नंतर ती तसबीर बाबांच्यासाठी मांडलेल्या पाटावर ठेवली गेली व त्यांना नैवेद्य दाखविल्यावर साईंच्या नाम गजरात सर्वांची भोजने झाली.

पुढे नऊ वर्षे गेली तरी त्या दोघा मुसलमानांची व अण्णासाहेबांची भेट झाली नाही. एक दिवस अचानक अलीमहमूद अण्णासाहेबांना भेटला तेव्हा त्याने त्या तसबिरीची हकीकत सांगितली. तो म्हणाला, "मी बाबांचा परमभक्त आहे. एकदा रस्त्याने जाताना ती तसबीर मी घेतली व घरात इतर संत अवलियांच्या तसबिरीत ती लावली. त्याच सुमारास माझ्या मेहुण्याने आपल्या गुरूंची तसबीर स्वतःच्या घरात लावली होती. ते ऐकून त्याचे गुरु अत्यंत कोपले होते. (कारण ती मूर्तिपूजा होते म्हणून. इस्लाम धर्माला ती संमत नाही.) त्यांच्या आदेशावरून मेव्हण्याने आपल्या घरातील सर्व तसबिरी समुद्रात नेऊन बुडविल्या व नंतर मलाही तसे करण्यास त्याने सांगितले. मी कबूल झाल्यावर त्याने आपला नोकर माझ्याकडे पाठविला. नोकराने सगळ्या तसबिरी शोधून नेल्या, पण आश्चर्य असे की ती एकच बाबांची तसबीर

त्याच्या नजरेतून सुटली व भिंतीवर राहिली. मेव्हण्याला हे जर कळले तर तो आकांत करील हे जाणून मी ती तसबीर कागदात गुंडाळून कपाटात अगदी खाली ठेवून दिली. ती कुणातरी योग्य माणसाला द्यावी अशी माझी इच्छा होती. त्या होळी पौर्णिमेच्या दिवशी पहाटे, म्हणजे अण्णासाहेबांना दृष्टांत झाला त्याचवेळी, बाबांनीच स्वप्नात येऊन आपले नाव सुचविले व पत्ता सांगितला. ते म्हणाले, "मला आज त्यांच्या घरी जेवायला जायचे आहे तरी जेवणापूर्वी मला तिथे नेऊन पोचव." म्हणून लगेच मी एका मित्राबरोबर आपल्याकडे येऊन ती तसबीर दिली.

ही हकीकत ऐकून अण्णासाहेबांना वाईट वाटले आणि ही साईबाबांची बरोबर सांगितल्याप्रमाणे अचूक वेळी हजर राहण्याची ही लीला आपण आधीच कशी काय ओळखली नाही. ते म्हणाले--

अहो साईनाथा ! बहुत चुकलो यास न तुला ।
करावी हो माफी मज धरुनि पोटास आपुल्या ॥
महात्मे स्वेच्छेने सतत फिरताती त्रिभुवनी ।
तयांते जाणावे मतिस अपुल्या शुद्ध करुनि ॥

थोडक्यात साधुसंत महात्मे शरीराने निघून गेले असले तरी ते अनेक सूक्ष्म रूपांनी आपल्या जवळ येऊन जातात असा हा बाबांचा विचित्र अनुभव, लीला आहे.

श्रीसाईबाबा स्वतः चूल पेटवीत असत. त्यावर भलीमोठी हंडी ठेवीत. नाना प्रकारच्या वस्तू ते बाजारातून आणीत व त्या सर्व एकत्र करून व उत्तम प्रकारे शिजवून आपल्या स्वतःच्या हाताने त्या वाटीत असत, आणि मग भक्तांच्या आनंदाशी एकरूप होऊन परमानंदाचा उपयोग ते घेत असत याची साक्ष बाबांच्या द्वारकामाईतील चूल आजही देते.

एकदा अशीच हंडी शिजत होती. जवळ जवळ शंभर भक्तांना पुरण्याइतकी ती मोठी होती. चुलीखाली जाळ पेटत होता व हंडीत शिजत घातलेल्या वस्तू खतखतत होत्या. त्यावेळी बाबांनी आपल्या एका भक्ताला हाक मारली, अरे नाना, जरा ती हंडी ढवळ बरं. हंडी ढवळण्याकरिता नाना उलथने पाहू लागला. तेव्हा बाबा म्हणाले, "अरे नाना असा पहातोस काय ? चल हो जरा दूर" असे म्हणून बाबांनी आपल्या कफनीच्या अस्तन्या वर केल्या आणि उजवा हात अगदी कोपरापर्यंत त्या हंडीत सारून आत खतखतत असणारे पदार्थ त्यांनी वरखाली केले. पण आश्चर्य असे की बाबांच्या हाताला काहीही झाले नाही.

# शिरडी-वृत्त माहे मार्च सन १९७९

या महिन्यात श्रीसाईबाबांचे दर्शनाकरिता बाहेरगावची भक्त मंडळी नेहमीप्रमाणे आली होती. काही कलाकारांनी श्रींचेपुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

**कीर्तन** :– १) श्री. ग. वि. जोशीशास्त्री संस्थान गवई यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली. २) श्रीमती ताराबाई देशपांडे, उस्मानाबाद यांचे कीर्तन झाले.

**प्रवचन** :– १) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिर्डी.

२) ह. भ. प. विश्वनाथ ब. राहाणे, औरंगाबाद.

३) ह. भ. प. नारायण स. कुलकर्णी, पंढरपूर.

४) प. पू. पुरुषोत्तमानंद सरस्वती, चिन्मय मिशन, पुणे.

**भजन गायन वादन** :– १) सौ. अनिती श्री. नागावकर, ठाणे. व महिला भजनी मंडळ. २) श्री. भगवान हि. वाडेकर, पुणे. ३) सौ. शोभना म. जावळे. विलेपार्ले, मुंबई. ४) कु. सुजाता स. दिंडे, कोल्हापूर. ५) श्री. अरविंदराव पवार. कोल्हापूर. ६) श्री. संपतराव दिंडे, कोल्हापूर. ७) श्री. नारायण गो. कोष्टी, मुंबई. ८) श्री. उमेश इन्सुलकर, मुंबई. ९) श्री. दिपक आजरेकर, मुंबई. १०) कु. सीमा मिस्त्री, मुंबई. ११) श्री. संजय मिस्त्री, मुंबई. १२) श्री. रमाकांत वालावलकर, मुंबई. १३) कु. जितेंद्र ताकेकर, मुंबई. १४) श्री. पंडीत गजानन पुराणिक, पुणे. १५) सौ. अलका भा. रिसवडकर, अंधेरी, मुंबई. १६) श्री. विरेंद्र म. सामंत, मुंबई. १७) ह. भ. प. दत्तप्रसाद प्रासादिक भजनी मंडळ, चेंबूर, मुंबई. १८) ह. भ. प. सिद्धकला भजनी मंडळ, बेळगाव. १९) श्री. विलासम् न्यू दिल्ली.

**गुढी पाडवा** :– गुढी पाडवा नवीन वर्षारंभानिमित्त संस्थानतर्फे श्रीसाईबाबांना महाअभिषेक करून मंदिराचे कळसाजवळ ध्वजारोहण करण्यात आले. सायंकाळी श्रींच्या रथाची मिरवणूक गांवातून फिरून आल्यावर रात्री हरिकीर्तन कार्यक्रम झाला.

**माननीयांच्या भेटी :**

१) मा. श्री. पी. एस. भास्करन्, इनकमटॅक्स कमिशनर, पुणे.
२) मा. श्री. मेजर जनरल डी. स्वरुप, डिफेन्स RLD न्यू दिल्ली.
३) मा. श्री. बी. पी. दलाल I. C. S. Rtd. माजी लॉ सेक्रेटरी, मुंबई.
४) मा. श्री. बी. एन. आडारकर, चेअरमन स्टेट ट्रान्सपोर्ट महाराष्ट्र.
५) मा. नामदार श्री. गोविंदरावजी आदिक, पाटबांधारे मंत्री महाराष्ट्र.
६) मा. नामदार श्री. उमरावसिंग, शिक्षण मंत्री, भोपाळ ( म. प्र. )
७) मा. श्री. आर. बी. सुळे, जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर.
८) मा. डॉ. एल. डब्ल्यू. गोगटे, सिव्हील सर्जन, अहमदनगर.
९) मा. नामदार श्री. शंकररावजी चव्हाण, अर्थ, उर्जा, नियोजन मंत्री, महाराष्ट्र.
१०) मा. श्री. ॐ प्रकाश गहरोत्रा IAS मु. कार्यकारी, अधिकारी. जि. प. अहमदनगर.
११) मा. श्री. कपूरीया, एअर इंडिया बोस्टन, अमेरिका.
१२) मा. श्री. ए. एस. बॉग. असि. मॅनेजर हॉटेल रमा इंटरनॅशनल, औरंगाबाद.
१३) मा. श्री. टी. पी. एविंग न्यूयॉर्क, अमेरिका.
१४) संत गुलाब बाबा, काटेलकोलत, नागपूर.
१५) स्वामी पुरुषोत्तमानंदजी सरस्वती, चिन्मय मिशन पुणे.
१६) मा. श्री. एन्. ई. मोलन, न्यूयॉर्क अमेरिका.

**हवापाणी :–** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

०००

# श्रीसाई भेट

मृदुशय्येवरी कळा न समजती
तृणावरल्या शय्येच्या

अनुभवल्याविन ना उमजती व्यथा
तशा त्या गरिबांच्या

मी तर मध्य भोंवतीचें जग
तेच पाहते वरचेवरी

त्यांतिल खोट्या स्तुतीस्तवही
आसुसते अन्...ही व्यर्थ व्यथा

सहज म्हणुनी जरी शब्द एक दो
दिल्या कुणा त्या गरिब मना

किति हर्षाचे, समाधानाचे लोट
उसळती तये मनी

हलक्या केल्या व्यथा दुजांच्या
विना साधुनि स्वार्थ त्यांतुनी
यांतची भेटे हृदया साई
छबी जरी नच दिसे नयनी
नयन भेटीच्या अनेक पटीने
ही साई भेट हो मोठी किती

—अ. रा. नाईक
सिताराम बिल्डींग
डॉ. दादाभाई नवरोजी रोड,
मुंबई ४००००१

# ॥ ॐ नमो साईनाथा ॥

ॐ नमो ऽ जी साईनाथा
शरणागता सदा रक्षिता ॥१॥
देवाधिदेवा दया सागरा
भक्त कामकल्पद्रुम दातारा ॥२॥
चैतन्यदायी दिवाकरा
परंज्योति तू प्रभाकरा ॥३॥
अज्ञान सिंधुतुनि पैलतिरा
न्यावया तूच समर्थ परमेश्वरा ॥४॥
मजवरी आता कृपा करा
मत्पाप विपाक नाश करा ॥५॥
देऊनिया तवपदीं आसरा
करूणाकरा मज क्षमा करा ॥६॥
अनन्यभावें मी तुज शरण
तुजविना मज रक्षिल कोण ॥७॥
पापी मी परम हीन दीन
मज द्यावे हेचि दया दान ॥८॥
घडावी मज सत्संगति
त्याचिया योगें पावेंन सद्गति ॥९॥
वाढो सदा सद्धर्म योग कर्म
सदाचार विचार सन्मति मर्म ॥१०॥
काम क्रोध मोह लोभ मद मत्सर
भवसागरी षड्रिपु ते भयंकर ॥११॥
आणिक भय, चिंता अहंकार
निर्दाळावे या सर्वांसि सत्वर ॥१२॥
असो द्या माझें सर्वांवरी सत्प्रेम
सर्वांचे तसेंच मजवरी तत्प्रेम ॥१३॥
मज हातीं सर्वांचे सदा क्षेम
घडावें हाच लाभ असो अंतिम ॥१४॥
हृदय निरांजनीं शुद्ध प्रेम ज्योत
सदा उजळो हेचि असो ॐ तत्सत ॥१५॥

— प्र. के. अमृते